सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. २० मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३५३ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## लाखो भाविकांचे नाथनगरीत आगमन; प्रशासनाच्या वतीने दिंड्यांचे स्वागत

तभा वृत्तसेवा

पैठण दि १९ :- वैष्णव भक्तांची मांदियाळी असलेल्या नाथषष्टी यात्रा महोत्सवात सहभागी होण्यासाठी पैठणनगरीच्या दाही दिशेतून लाखो भाविक भक्त दिंड्यांद्वारे भानुदास एकनाथ, भानुदास एकनाथ नामाचा जयघोषात दक्षिण काशीत दाखल होत असून नगर परिषद प्रशासनाच्या वतीने सह्याद्री चौकातील प्रवेश मार्गावर या दिंडी प्रमुखांचे स्वागत करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, तहसीलदार दत्तात्रय भारस्कार,,उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ सिद्धेश्वर भोरे,,मुख्याधिकारी तथा प्रशासक संतोष आगळे, पोलीस निरीक्षक संजय देशमुख,,उप मुख्याधिकारी नागेश खोडवे,,उप मुख्याधिकारी एसीबी गर्जे,पाणीपुरवठा विभाग प्रमुख व्यंकटी पापुलवार,व्यवस्थापन प्रमुख अशोक मगरे, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

गुरुवार दिनांक २० मार्च पासून ते २२ मार्च असा नाथषष्टी महोत्सवाचा मुख्य सोहळा पार पडणार असून यासाठी राज्यासह देशभरातील भाविक भक्त दिंड्यांद्वारे पैठणनगरीत दाखल झालेत.विविध रथ घेउनी, हातात भगवी पताका, मुखी हरिनामाचा गजर करत लाखो भाविक भक्त वाळवंट तसेच आपल्या फडाठिकानी पोहचलेत.रविवारी सकाळी श्री संत एकनाथ महाराज समाधी मंदिरात खासदार संदीपान भुमरे,आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्याहस्ते सपत्नीक पूजा होणार आहे. बुधवारी मानकऱ्यांना तसेच



लक्ष्मीदेवी मंदिरात अक्षत वाटप करत दोन्ही मंदिरात होणाऱ्या धार्मिक उत्सवात सहभागी होण्याचे निमंत्रण देण्यात आले.गुरुवार दिनांक २० मार्च रोजी सकाळी नाथवंशजांची मनाची दिंडी पारंपरिक मार्गाने गावांतील नाथ मंदिर ठिकाणाहून पूजन करून नाथ समाधी मंदिराकडे प्रस्थान करणार आहे.शुक्रवार २१ मार्च रोजी मध्यरात्री गावांतील नाथ मंदिरातून शांतिब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज यांच्या पादुकांचे भव्य छबिना उत्सव पार पडून दिनांक २२ मार्च शनिवार रोजी सायंकाळी सुर्यास्ता समयी नाथ समाधी मंदिर व मंदिरा बाहेर कालाष्टमी परंपरेचे अभंग आणि आरती होऊन दहीहंडी फोडून नाथषष्ठी यात्रेची सांगता होणार आहे.

पवित्र रांजण भरला

पैठण येथील श्रीसंत एकनाथ महाराज यांच्या नाथवाड्यातील पांडुरंगाने बारा वर्षे नाथाघरी कावडीने पाणी भरले. हा पवित्र रांजण तुकाराम बीज या दिवशी गोदावरीतील पाणी टाकून भरण्यास प्रारंभ केला होता. यावर्षी रांजण भरण्याचा मान ओंकार खिस्ती, प्रतीक्षा मुले,आणि व्यंकटेश नारळे या तिघांना मिळाला.या तिघांचा भगवान श्रीखंड्याचे रूप म्हणून सत्कार करण्यात आला.

नाथसागरातून सोडणार पाणी

नाथषष्ठी यात्रा उत्सव २०२५ निमित्य जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या वतीने भाविकांना शाहीस्नान करता यावे म्हणून गोदावरी पात्रात धरणाच्या दोन गेट मधून पाणी सोडण्यात येणार असल्याची माहिती शाखा अभियंता विजय काकडे,,उप अभियंता गणेश खराडकर यांनी दिली. पाणी सोडण्याची ही प्रक्रिया चार दिवस चालणार आहे. यापाठोपाठ नाथसागर जलाशयात भाविकांच्या स्नानासाठी विशेष खबरदारी घेण्यात येत असून जलतरण बचाव पथक बोटीसह तैनात करण्यात आले आहे.

## यंदाच्या GATE परीक्षेचा निकाल जाहीर!

मुंबई : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी रुरकी ने अभियांत्रिकी पदवीधर अभियोग्यता चाचणी चा निकाल जाहीर झाला आहे. रुरकी येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीतर्फे हा निकाल जाहीर करण्यात आला आहे. हा निकाल gate2025.iitr.ac.in आणि goaps.iitr.ac.in या अधिकृत वेबसाइटवर जाहीर केला असून उमेदवार आता त्यांच्या लॉगिनचा वापर करून तपासू शकणार आहेत.

निकाल कसा पहावा?

परीक्षार्थी विद्यार्थ्यांना GO-PS पोर्टल वेबसाइट - gate2025.iitr.ac.in ला भेट द्यावी लागेल. त्यानंतर नोंदणी आयडी किंवा ईमेल पत्ता आणि पासवर्ड यासारख्या आवश्यक क्रेडेन्शियल्स वापरून लॉग इन करा. त्यानंतर 'GATE 2025 निकाल' टॅबवर क्लिक करा. GATE चा निकाल स्क्रीनवर दिसेल. त्यांना भविष्यातील संदर्भासाठी निकाल डाउनलोड करून सेव्ह करावा लागेल.


दरम्यान, उमेदवारांनी GATE २०२५ चा निकाल डाउनलोड करण्यासाठी लॉगिन क्रेडेन्शियल्स विसरले असतील, तर अधिकृत वेबसाइट - gate2025.iitr.ac.in वर विसरलेले क्रेडेन्शियल्स परत मिळवण्यासाठी एक टॅब आहे. उमेदवारांना त्यांच्या ईमेल आयडीने लॉग इन करावे लागेल आणि नोंदणी आयडी परत मिळवावा लागेल.

२०२५ साठी पात्रताधारक GATE कटऑफ उमेदवाराच्या तपशीलांसह आणि मिळालेल्या गुणांसह प्रदान केला जाईल. स्कोअरकार्डमध्ये परीक्षेच्या प्रत्येक विभागात उमेदवाराने मिळवलेले गुण, एकूण गुण आणि अखिल भारतीय रँक (AIR) यांचा समावेश असेल. अर्जदारांनी लक्षात ठेवावे की स्कोअरकार्ड फक्त कटऑफ स्कोअर पूर्ण करणाऱ्या किंवा त्यापेक्षा जास्त असलेल्यांसाठीच जारी केले जाईल.

## जेएनपीए बंदर ते चौक सहा मार्गिकांच्या ग्रीनफिल्ड महामार्गाला केंद्राची मंजुरी

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार विषयक केंद्रीय मंत्रिमंडळ समितीने महाराष्ट्रातील जेएनपीए बंदर येथील पागोटे ते चौक असा २९.२१९ किमी. चा सहा पदरी प्रवेश नियंत्रित ग्रीनफिल्ड द्रुतगती राष्ट्रीय महामार्ग बांधायला मंजुरी दिली आहे. हा प्रकल्प बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा अर्थात बीओटी तत्त्वावर विकसित केला जाणार असून त्यासाठी एकूण ४५००.६२ कोटी रुपये भांडवली खर्च अपेक्षित आहे.

पंतप्रधान गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन अंतर्गत भारतातील प्रमुख आणि लहान बंदरांशी जोडणाऱ्या रस्त्यांच्या पायाभूत सुविधांचा विकास हा एकात्मिक



पायाभूत सुविधा नियोजनाच्या प्रमुख प्राधान्य क्षेत्रांपैकी एक आहे. जेएनपीए बंदरातील कंटेनरचे वाढते प्रमाण आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकास, या गोष्टी लक्षात घेता या प्रदेशातील राष्ट्रीय महामार्ग कनेक्टिव्हिटी अर्थात दळणवळण वाढवण्याची गरज ओळखून ग्रीनफिल्ड महामार्गाला केंद्राने मंजुरी दिली आहे.

सध्या पळस्पे फाटा, डी-पॉईंट, कळंबोली जंक्शन, पनवेल सारख्या शहरी भागातील प्रचंड वाहतूक कोंडीमुळे जेएनपीए बंदरातून निघालेल्या वाहनांना राष्ट्रीय महामार्ग-४८ चा मुख्य सुवर्ण चतुर्भुज टप्पा आणि मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर पोहोचायला दोन ते तीन तास लागतात. नवी मुंबई विमानतळ २०२५ मध्ये कार्यान्वित झाल्यावर थेट कनेक्टिव्हिटीची गरज आणखी वाढेल. ही गरज पूर्ण करण्यासाठी तसेच जेएनपीए बंदर आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ जोडण्याची लॉजिस्टिक कार्यक्षमता सुधारण्यासाठी हा प्रकल्प आखण्यात आला आहे.

हा प्रकल्प जेएनपीए बंदर (एनएच ३४८) (पागोटे गाव) येथे सुरू होईल आणि मुंबई-पुणे महामार्गावर (एनएच -४८) संपेल, तसेच तो मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई गोवा राष्ट्रीय मार्गाला (एनएच -६६) देखील जोडेल. व्यावसायिक वाहनांच्या वाहतुकीसाठी सह्याद्री पर्वत रांगेत दोन बोगदे खणले जातील, जेणेकरून या वाहनांना डोंगराळ भागात घाटातून प्रवास करावा लागणार नाही, तसेच मोठ्या कंटेनर ट्रकचा वेग वाढेल आणि त्याची सुलभ वाहतूक होईल. नवीन सहा पदरी ग्रीन फिल्ड प्रकल्प कॉरिडॉरमुळे बंदराचे दळणवळण सुधारेल,तसेच सुरक्षित आणि कार्यक्षम मालवाहतुकीला सहाय्य मिळेल. या प्रकल्पामुळे मुंबई आणि पुणे आणि आसपासच्या विकसनशील परिसरात विकास आणि समृद्धीचे नवे मार्ग खुले होतील.

## जळगावात सोन्या-चांदीच्या दराने गाठला नवा उच्चांक

जळगाव : लग्नसराईच्या हंगामातच सोने आणि चांदीच्या दरांनी नवा उच्चांक गाठला आहे. जळगावच्या प्रसिद्ध सराफा बाजारात सलग दुसऱ्या दिवशी सोन्याच्या दरात वाढ झाली असून, चांदीच्या किमतींनीही विक्रमी पातळी गाठली आहे. २४ कॅरेट सोन्याचा दर (विना जीएसटी) ८८,८०० रुपये प्रति १० ग्रॅम वर पोहोचला, तर जीएसटीसह हा दर ९१,४६४ रुपये प्रति १० ग्रॅम झाला आहे. चांदीच्या दरातही मोठी वाढ होत १,०२,५०० रुपये प्रति किलो या ऐतिहासिक उच्चांकावर चांदी पोहोचली आहे.



केवळ गेल्या १८ दिवसांत सोन्याचा दर तब्बल ३३०० रुपयांनी, तर चांदीचा दर ६०००-६५०० रुपयांनी वाढला आहे. मध्य पूर्वेतील तणाव व जागतिक अस्थिरता - आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वाढता तणाव आणि अमेरिका-चीन व्यापार धोरणांमुळे गुंतवणूकदारांनी सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याकडे मोर्चा वळवला आहे.डॉलर मजबूत झाल्याने सोन्याचे दरही वाढले आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेतील अस्थिरतेमुळे सोने आणि चांदीत अधिक गुंतवणूक केली जात आहे. सोने आणि चांदीच्या वाढत्या दरांमुळे सर्वसामान्य ग्राहकांसाठी लग्नसराईत दागिने खरेदी करणे कठीण झाले आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत सोन्याच्या दरात प्रचंड वाढ झाली असून, अनेक ग्राहकांनी खरेदीला ब्रेक लावल्याचे सराफा व्यावसायिक सांगत आहेत. येत्या काळातही दर वाढण्याची शक्यता असल्याने गुंतवणूकदारांसाठी मात्र हा चांगला काळ मानला जात आहे.

## राष्ट्रीयकृत बँकांकडून मिनिमम बॅलेन्सच्या दंडापायी १५ हजार कोटींची वसुली

### कमाल रकमेवर दंडाचे आरबीआयचे नियमच नाहीत; वसुलीमध्ये एसबीआय, पीएनबी आघाडीवर

छत्रपती संभाजीनगर : खात्यामध्ये निश्चित रकमेपेक्षा कमी पैसे असतील तर बँका त्यावर मनमानी पद्धतीने दंड आकारतात. 'मिनिमम बॅलेन्स' च्या नावाखाली दंड आकारण्याबाबत नियम नसला तरी ग्राहकांची पिळवणूक होऊ नये, अशी अपेक्षा रिझर्व्ह बँकेने व्यक्त केली आहे. असे असतांना देशातील १२ सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी (पीएसबी) गेल्या १० वर्षात १५,००० कोटींहून अधिकची रक्कम दंडापायी वसुल केली. सर्वाधिक दंड एसबीआय आणि पीएनबी बँकेने वसुल केला.

बँकांना ग्राहकाचे खाते अद्ययावत ठेवण्यासाठी खर्च लागतो. त्यासाठी मिनिमम बॅलेन्स चार्जेस लावत असल्याचे बँका सांगतात. खात्यात किमान रक्कम आणि दंडाबाबत प्रत्येक बँकांचे वेगवेगळे नियम आहेत. या रकमेबाबत बँकांनी ग्राहकांना एसएमएस किंवा मेलद्वारे माहिती देणे बंधनकारक आहे. बँका ही माहिती देतात. मात्र, ग्राहक त्याकडे दुर्लक्ष करतात. परिणामी बँकांना दंड आकारण्याची संधी मिळते. या पद्धतीने १२ पीएसबींनी २०१४-१५ ते २०२३-२४ या १० वर्षात वसूल केलेल्या दंडाची रक्कम १५,००० कोटीच्या पुढे गेली आहे.

सर्वाधिक वसुली २०१७-१८ मध्ये

१० वर्षात सर्व बँकांनी मिळून २०१७-१८ मध्ये सर्वाधिक ३४९० कोटीचा दंड आकारला. यात एकट्या एसबीआयचा वाटा ७० टक्के होता. त्यापाठोपाठ २०२३-२४ मध्ये २३३१ कोटी दंड वसुल करण्यात आला. वर्ष आणि कंसात दंडाची रक्कम कोटी रुपयात पुढीलप्रमाणे-

२०१४-१५ -(७७८),२०१५-१६-(८४१), २०१६-१७ -(९२६), २०१७-१८-(३४९०), २०१८-१९-(९८९), २०१९-२० -(१७३८), २०२०-२१-(११४२), २०२१-२२-(१४२९), २०२२-२३ -(१८५५), २०२३-२४ -(२३३१)

सर्वाधिक वसुली

देशात पूर्वी २७ पीएसबी होत्या. पैकी काही दुसऱ्या बँकांमध्ये मर्ज झाल्याने पीएसबीची संख्या १२ उरली आहे. आरबीआयच्या निर्देषाप्रमाणे बँकेत कमाल रक्कम नसली तरी बँकांनी ग्राहकांना एटीएम, सीडीएममध्ये रक्कम काढणे व जमा करण्याची सुविधा, जमा वा काढलेल्या रकमेची पावती प्रदान करणे, महिन्यात कितीही वेळेस पैसे जमा करण्याची सुविधा, एटीएमसह महिन्यात ४ वेळेस विनामूल्य पैसे काढण्याची सोय तसेच एटीएम कार्ड देणे बंधनकारक आहे.

## गेम्स२४X७ फाउंडेशनतर्फे धाराशिव मध्ये 'व्हील्स ऑफ चेंज' उपक्रमात; मुलींना २०० सायकलीचे वाटप

### विद्यार्थिनींना शिक्षणासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवासातील अडथळे दूर करत शिक्षण सुलभ करण्याचा प्रयत्न

धाराशिव,१८ मार्च - गेम्स२४७ चा समाजसेवी उपक्रम असलेली गेम्स२४x७ फाऊंडेशन ग्रामीण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संधी वाढवण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. याच पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यातील परांडा, तुळजापूर, उमरगा, धाराशिव, भूम, कलम, लोहरा आणि वाशी या ८ तालुक्यांमध्ये 'व्हील्स ऑफ चेंज' उपक्रमाच्या माध्यमातून आणखी २०० सायकली वितरित करण्यात आल्या. या आधी, २०२४ मध्ये १,००० सायकलींचे वाटप करण्यात आले होते. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थिनींना शिक्षणासाठी करावा लागणाऱ्या प्रवासातील अडथळे दूर करून त्यांना शिक्षणासाठी अधिक संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

या कार्यक्रमाला धाराशिव जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष (आयएएस), प्राथमिक शिक्षण अधिकारी श्री. अशोक पाटील, आणि गेम्स२४x७च्या जनसंपर्क, संप्रेषण व सामाजिक दायित्व उपक्रम विभागाच्या उपाध्यक्ष नेहा सिंघवी यांच्या उपस्थितीत सायकलींचे वितरण करण्यात आले.

''दूरवर प्रवास करावा लागतो म्हणून कोणाच्याही शिक्षणावर मर्यादा येऊ नयेत. 'व्हील्स ऑफ चेंज' उपक्रमाचा विस्तारासह आम्ही विद्यार्थ्यांसाठी अशी सोय करू इच्छितो जिथे त्यांची पार्श्वभूमी न बघता त्यांना शिक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व संसाधने मिळावी. प्रत्येक विध्यार्थ्याला शिक्षण मिळावे यासाठी राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमासाठी धाराशिव प्रशासनाने दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. या सायकलींमुळे शक्य होणारा शैक्षणिक प्रवास विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्ज्वल आणि न्याय्य भविष्याकडे घेऊन जाईल अशी आम्हाला आशा आहे'', असे गेम्स२४७चे सहसंस्थापक व सह-मुख्य कार्यकारी अधिकारी भाविन पंड्या म्हणाले.

''शिक्षणातील अंतर भरून काढण्यासाठी सरकारी आणि सामाजिक जबाबदारी असलेल्या संस्थांमध्ये सहकार्य गरजेचे आहे. गेम्स२४x७ फाउंडेशनचा 'व्हील्स ऑफ चेंज' उपक्रम हा विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सुलभ करण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल आहे. दीर्घकालीन सकारात्मक परिणाम घडविणाऱ्या अशा उपक्रमांना पाठिंबा दिल्याचा आम्हाला अभिमान आहे'', असे धाराशिव जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष (आयएएस) म्हणाले.

या उपक्रमाने अनेक सकारात्मक परिणाम घडवून आणले आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची हजेरी पटावरील उपस्थिती, शैक्षणिक प्रवेश आणि शिक्षण चालू ठेवण्याचे प्रमाण वाढले आहे. पहिल्या ६ महिन्यांत उपस्थितीचे प्रमाण ८०.९८% वरून ९२.४२% पर्यंत वाढले. माध्यमिक शिक्षणासाठी प्रवेशाचे प्रमाण ८४.६९% वरून ९४.३१% पर्यंत वाढले, ज्यामुळे अधिक मुलींना त्यांचे शिक्षण चालू ठेवता आले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या उपक्रमामुळे सायकल मिळालेल्या विद्यार्थिनींपैकी एकाही विद्यार्थिनीने शाळा सोडली नाही.

हा उपक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असून, लांब अंतरामुळे नियमित शाळेत जाता न येणाऱ्या विद्यार्थिनींच्या शिक्षणात सातत्य ठेवण्याचा प्रयत्न करतो. सायकली वाटपाच्या पुढे जाऊन, फाउंडेशन स्थानिक सहयोगींसोबत मिळून शाळेतील उपस्थिती, शाळेत येण्याची शिस्त आणि शैक्षणिक प्रगती याची माहिती गोळा करून या उपक्रमाद्वारे होणाऱ्या सकारात्मक दीर्घकालीन प्रभावाचा मागोवा घेत आहे.

गेम्स२४x७ फाउंडेशनने आपल्या पालक संस्थेच्या सोबत मिळून याआधी कैलाश सत्यार्थी चिल्ड्रन्स फाउंडेशन, क्रिस्टल हाऊस आणि अशा अनेक स्वयंसेवी संस्थांसोबत भागीदारी करून सामाजिक परिवर्तन घडवणारे उपक्रम राबवले आहेत. विशेषतः, कैलाश सत्यार्थी चिल्ड्रन्स फाउंडेशनसोबत बाल तस्करीविषयी अभ्यास करण्यासाठी गेम्स२४७ने तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले, ज्यामुळे संवेदनशील मुलांवर माहिती संकलन व विश्लेषण करणे शक्य झाले. अशा उपक्रमांमुळे देशभरातील अनेकांचे जीवन सकारात्मक बदलत आहे.




# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कामाला लागा–अशोक पटवर्धन

**बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**

महाराष्ट्र राज्यामध्ये महायुतीची सत्ता प्रस्थापित झाली असून शिवसेना महायुतीचा एक भाग आहे. यामुळे आपण सर्वजण सत्तेत आहोत. या सत्तेचा लाभ जनते पर्यंत पोहचवा. काही महिन्यातच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे आतापासूनच तयारीला लागा असे नवनिर्वाचित शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब यांनी आढावा बैठकीत मार्गदर्शन केले. याबरोबरच पुढील महिन्यात पुन्हा एकदा तालुका निहाय बैठकीचे आयोजन करण्यात येणार असून त्यामध्ये सर्वांनी आपआपल्या कामाचा अहवाल घेऊन उपस्थित राहायचे आहे असे देखील अशोक पटवर्धन यांनी सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांना सांगितले.



दि. १८ रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत अशोक पटवर्धन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा केली. याबरोबरच बीड जिल्हा शिवसेनेची पुढील वाटचाल दिशा ध्येय धोरण सविस्तरपणे समजून सांगितले. यानंतर शिवसेना ओबीसी व्ही जे एनटी महाराष्ट्र संपर्कप्रमुख किरण चव्हाण, युवसेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे आणि ऋषि जगताप यांचे वाढदिवसानिमित्त शुभेच्छा सत्कार करून बीड जिल्हा शिवसेनेच्या अभिष्टचिंतन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना महिला आघाडी युवसेना शेतकरीसेना आजी माजी सरपंच पदाधिकारी लोकप्रतिनिधी तथा शिवसैनिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा–जगताप, मुळूक गलधर

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब सर्वसामान्यांच्या मनातील आवडत नेतृत्व आहेत. कार्यकर्त्यांना जपणे त्यांना आधार देणे ही शिंदे साहेबांची सवय बनलेली आहे म्हणूनच शिंदे साहेबांच्या नेतृत्वात अवघ्या महाराष्ट्रभरात शिवसेनेची ताकद वाढत चालली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या आहेत. आपल्या आगामी निवडणुकात संपूर्ण बीड जिल्ह्यात शिवसेनेचा भगवा फडकवायचा असून आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात देखील आपल्याला बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागायाचे आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी आढावा बैठकीत अवाहन केले.



गेवराई : रब्बी हंगामातील पिकांची काढणी अंतिम टप्प्यात असून सिरसदेवी येथे मळणीयंत्राद्वारे गव्हाचे खळे सुरू आहे. मेहनतीने पिकविलेल्या धान्याची रास गोळा करताना शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते. (छाया: कृष्णा शिंदे)

# विकास बनसोडे याच्या मारेकऱ्यास तात्काळ अटक करून फाशी द्या–मोरे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**

ट्रक चालवुन आपली व कुटूंबीयांची उपजिविका भागविणाऱ्या विकास बनसोडे या २५ वर्षीय तरूणास मारणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शासन करून फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केली आहे.



मुळचा जालना येथील विकास बनसोडे हा पिंपरी घुमरी ता. आष्टी येथील भाउसाहेब क्षीरसागर यांच्या ट्रकवर चालक म्हणुन काम करत होता. भाउसाहेब क्षीरसागर यांच्या मुलीशी त्याचे प्रेमसंबंध असल्याच्या संशयावरून क्षीरसागर कुटुंबीयाने बनसोडे यास पकडून घराजवळील पत्र्याच्या शेडमध्ये बांधुन टाकत दोन आणि वायाराच्या सहाय्याने विकासला बेदम मारहाण केली. यातच त्याचा मृत्यु झाला आहे.त्याच्या शरीरावर मोजता येणार नाहीत एवढे वळ आहेत. त्यामुळे विकास बनसोडे यास मारणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करून शासनाने कठोर कारवाई करून त्यांना फाशिची शिक्षा द्यावी अशी मागणी उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी केली आहे.

# सौ.संजीवनी जाधव व डॉ.प्रियांका डाके ठरल्या मिसेस माजलगावच्या मानकरी

## रोटरी क्लब, मंगलनाथ मल्टिस्टेट व इगलवूड स्कुल च्यावतीने मिसेस माजलगाव कार्यक्रम संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ मार्च**

दिनांक १६ मार्च रोजी रोटरी क्लब, मंगलनाथ मल्टिस्टेट व इगलवूड स्कुलच्या वतीने मिसेस माजलगाव या अनोख्या उपक्रमाच्या माध्यमातून स्पर्धचे आयोजन इगलवूड स्कूल फुले पिंपळगाव येथे करण्यात आले होते.कार्यक्रमात प्रथम क्रमांक सौ.संजीवनी जाधव तर द्वितीय क्रमांक डॉ.सौ.प्रियांका डाके यांनी मिळवला. तृतीय क्रमांक सौ.शीतल मालानी यांनी मिळवला तर सौ शुभांगी आनंदगावकर यांनी चौथ्या स्थानावर येण्याचा मान मिळवला.या उपक्रमाच्या माध्यमातून अनेक स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.माजलगाव शहर व परिसरातील महिलांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बक्षिसे जिंकली.

या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे अध्यक्ष तथा मंगलनाथ मल्टीस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक ॲड.रवींद्र कानडे, प्रकल्प प्रमुख डॉ.अर्चना पवार व रोटरियन अशोक बजाज, लक्ष्मीनारायण मुंदडा, शशी किरण गडम, सुरेश भानप, पंडित तिडके, डॉ.स्वानंद कुलकर्णी, जगदीश साखरे, गवारे सर, दिगंबर महाजन, डॉ.अंजली अकोलकर, डॉ.अर्चना मोरे, सौ.स्मिता लिमगावकर, शोभा वर्मा, सौ.सोळंके उपस्थित होते.

त्याचप्रमाणे इनरव्हील क्लब ऑफ माजलगावच्या अध्यक्ष सौ.प्राजक्ता गुंडेवार, सेक्रेटरी सौ.स्मिता कानडे व इनरव्हील क्लबच्या सर्व मेंबर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु.जान्हवी वाघ आणि कु.प्रांजल देशमुख या विद्यार्थीनिंनी केले. मिसेस माजलगाव या सौंदर्य स्पर्धेचे सूत्रसंचालन सौ.प्रणिता मॅडम यांनी केले व आभार प्रदर्शन सत्यजित सरांनी केले. सदरील कार्यक्रमाकरिता माजलगाव शहर व परिसरातील शेकडोच्या संख्येने महिला उपस्थित होत्या. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे सर्व सदस्य, ईगलवूड इंग्लिश स्कूल व श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचा सर्व स्टाफ यांनी परिश्रम घेतले.

# गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतनानिमीत्त रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ मार्च**

प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अन्ड कॅन्सर रिसर्च सेंटर च्या वतीने श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊलींच्या अभिष्टचिंतन निमित्त दि. १९ मार्च बुधवार रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर प. पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अन्ड कॅन्सर रिसर्च सेंटर येथे सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे. या रक्तदान शिबीरात सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन डॉ यशवंत राजेभोसले यांनी केले आहे.

दि. १९ मार्च ते ३० मार्च दरम्यान सध्या मुळव्याध, भगंदर, नासर, बालरोग, सर्व महिला रोग, मासिक पाळी चे आजार, वंध्यत्व, पोटाचे विकार, वृध्दपकाळातील आजार, मधुमेह, पंचकर्म यासह विविध प्रकारच्या आजारांचे मोफत तपासणी शिबिर चालू आहे या शिबीराचा माजलगाव शहरासह तालुक्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ यशवंत राजेभोसले, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल चे अध्यक्ष पांडुरंग चांडक, सचिव प्रभाकर शेटे तसेच श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचे तालुका प्रतिनिधी शिवशंकर भंडारे, केंद्र प्रतिनिधी दिगंबर सोळंके, अमोल सोळंके, रामराजे रांजवण, लक्ष्मण चुंबळे, सदाशिव ढगे, काशिनाथ काटकर, गजु चौधरी, डॉ अशोक घुबडे, डॉ शशिल पाचपोर, लक्ष्मण सोळंके, विशाल देवकते, शरद रुचके, रामप्रसाद गोळेकर, गजानन गोळेकर, गोरख मेंडके आदींनी केले आहे..

# बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

## आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीला यश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**



आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती, त्यांच्या मागणीला यश आले असून उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा उल्लेख करून विधानसभेत बीड येथे नवीन विमानतळ उभारण्याची घोषणा केली. यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असून जिल्ह्यातील उद्योग वाढीला मोठा फायदा होणार आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सक्रिय सहभाग नोंदवत विविध विषयांची प्रभावी मांडणी केली आहे. अर्थमंत्री ना अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चे दरम्यान आ. विजयसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यासाठी नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती. अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करून बीड येथे नवीन विमानतळ उभारणीसाठी कार्यवाही सुरू करत असल्याची घोषणा केली. यामुळे बीड येथे नवीन विमानतळ उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. बीड जिल्हाधिकारी यांनी याबाबतच प्रस्ताव पाठवला असून त्यावर भूसंपादन आणि इतर सोपस्कार व्हावे तसेच इतर बाबीवर कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे असे सांगून बीड येथे कमीत कमी तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारली जाईल असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. यामुळे बीड जिल्ह्याच्या ग्रामीण भागाला विकासाच्या टप्प्यात येता येणार आहे. पर्यटन आणि इतर व्यवसायाला चालना मिळेल असेही ते यावेळी म्हणाले.

दरम्यान विजयसिंह पंडित यांनी विधानसभा सदस्य झाल्यानंतर आपल्या भागातील विकासाचे अनेक प्रश्न त्यांनी विधानसभेत मांडले. जलसंधारण, कृषी याबरोबरच विमानतळ उभा करण्याची मागणी करून त्यांनी आपल्या भविष्यवेधी नेतृत्वाची झलक दाखवली. आ. विजयसिंह पंडित यांनी बीडच्या विमानतळाचा प्रश्न निकाली काढल्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व स्तरातून त्यांचे आभार मानण्यात येत आहेत.

# मनोजदादा जरांगे यांची शिवाजीराव पंडित यांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१८ मार्च**

मराठा आरक्षणासाठी लढणारे संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांची माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी भेट घेऊन त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. मराठा आरक्षणाशिवाय मराठा समाजाचा उद्धार होऊ शकत नाही, मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी जो लढा उभारला तो योग्यच आहे. आपण आणि शिवछत्र परिवर मराठा आरक्षणासाठी आग्रही राहीलो. यापुढील काळात आपण मनोज जरांगे यांच्या सोबतच राहू असे प्रतिपादन माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी केले.

माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांनी आज संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची चौकशी केली. आपण तब्येत सांभाळावी, मराठा समाजाला आपली गरज आहे. तुमच्या छायेखाली मराठा समाज एक झाला असून ही वज्रमूठ आता कोणीही रोखू शकत नाही. मराठा आरक्षणासाठी आपण कायम रस्त्यावर उतरलो. या वयातही आपण मराठा आरक्षण मिळवण्यासाठी संघर्ष केला. यापुढील काळात मराठा आरक्षणासाठी आपण कायम मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत आहोत असेही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी त्यांच्या सोबत जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अठरापगड जातींना सोबत घेऊन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढणार–राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने सामाजिक न्याय विभागाची बैठक राष्ट्रवादी भवन बीड येथे पार पडली, यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रांत अध्यक्ष पंडित कांबळे सर यांच्या उपस्थितीत बैठक बोलण्यात आली होती. यावेळी मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यातून प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के असे म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हा आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचारधारेवर चालतो त्यांनी अठरापगड जातींना सोबत घेऊन त्यांच्या न्याय हक्कासाठी सातत्याने प्रयत्न केला आहे, मराठवाड्याच्या विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी पुढाकार घेणारा नेता म्हणून पवार साहेबांची ओळख आहे,नामांतरांच्या वेळेला राजकीय किंमत मोजावी लागली तरी चालेल परंतु मराठवाडा विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचे काम पवार साहेबांनी केले आहे, पवार साहेब नेहमीच पुरोगामी विचार जोपासणारा नेता आहे अशा नेत्याच्या नेतृत्वाखाली आपण सर्व सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करतो, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये देखील वंचित समाजाला प्रतिनिधित्व देण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष करणार असल्यास मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले.

यावेळी प्रांताध्यक्ष श्री पंडित कांबळे सर यांनी असे सांगितले की माझ्यासारख्या सामान्य कुटुबातील व्यक्तीला पवार साहेबांनी सामाजिक न्याय विभागाची जबाबदारी दिली आहे, ती योग्यरित्या मी पार पाडत आहे श्री कांबळे यांनी बाळासाहेब शिनगारे यांना जिल्हा कार्याध्यक्षाची जबाबदारी दिली होती, त्यांचे काम पाहून बाळासाहेब शिनगारे यांची सामाजिक न्याय विभागाच्या बीड जिल्हाअध्यक्ष पदाचे नव्याने घोषणा केली आहे. बाळासाहेब शिनगारे हे बीड जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष वाढवण्यासाठी दिनदलित वंचित घटकांना एकत्र करून पवार साहेबांचे हात बळकट करणार आहेत, अशा भावना श्री कांबळे यांनी व्यक्त केल्या.

यावेळी केज मतदार संघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे , सामाजिक न्याय विभागाचे पतीश उपाध्यक्ष संजय गायकवाड,भिमराव जी,रविभाऊ खिल्लारे, तूप सौंदर साहेब,प्रदेश सचिव के के वडमारे , राहुल बनसोडे, भास्कर कुन्हे, लक्ष्मण कांबळे, तुकाराम साळुंखे, अंकुशराव दोडके,तानाजी लांडगे, सुधाकर जोगदंड, महादेव हजारे, श्रीमती मगरे ताई ,श्रीमती भोसले ताई, श्रीमती ज्योतीताई,अमोल पारवे, खुर्शीद आलम, आबा करडुले, शफिक काजी, सुधाकर चव्हाण, महेश सावंत, पंकज धांडे, अनिल शेळके, सचिन आगाम, महेश भिसे, बद्रीनाथ जटाळ, राकेश बिराजदार,सह आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.


# बीड जिल्हा कारागृह येथे प्रिझन टू प्राईड कार्यक्रमाचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**

इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड संभाजीनगर यांच्यामार्फत बीड जिल्हा कारागृह येथे प्रिझन टू प्राईड कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कारागृहातील बंद्यासाठी कॅरम व बुद्धिबळ खेळाचे साहित्य पुरविण्यात आले. तसेच सदर खेळाचे प्रशिक्षित प्रशिक्षकामार्फत बंदयाना एक महिन्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर खेळाचे प्रशिक्षणासाठी ४० बंद्यानी सहभाग घेतला आहे.सदर कार्यक्रम विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) मध्य विभाग छत्रपती संभाजी नगर यांच्या परवानगीने व इंडियन ऑइल कंपनीचे चीप मॅनेजर एलपीजी इक्बाल सिद्दिकी संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाने घेण्यात येत आहे.सदर कार्यक्रमास इंडियन ऑइल कार्पोरेशन लिमिटेड संभाजीनगर येथील श्री अमित विकास बोरसे, जयसिंग, इफ्तेकार, वाघमारे उपस्थित होते तसेच बीड जिल्हा कारागृह येथील प्र.अधीक्षक बक्सार मुलानी, संजय राऊत, ज्ञानेश्वर डोईफोडे, सुधाकर मुंडे, कृष्णा ढाकणे, राहुल राठोड कर्मचारी उपस्थितीत होते तसेच कारागृहातील बंदी बांधव उपस्थित होते.



## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (७०) परिवार

सरसंघचालक श्री गुरुजी यांना एकदा एका सज्ञन संघ चालकांनी विचारले की आता मी या पदावर आहे पण माझे काम काय ?

गुरुजीः- आज तुम्ही संयुक्त परिवाराचे वरिष्ठ आहात ना ?

सज्ञनः- हो माझ्या परिवारात माझा मुलगा मुलगी, भाचा भाची, नातू, नात दिर- भावजय व माझी आई आहे.

गुरुजीः- होय ना, मग वरिष्ठ म्हणून आपण काय काम करतां ?

सज्ञनः - सर्वांनी सुख- शांतीने, प्रेमाने जगावे म्हणून प्रयत्न करतो. त्यांचे आपसात भांडण होऊ देत नाही.

गुरुजीः- हे सगळे जण गुणवान चरित्र वाहक बनतील याबद्दल काय कराल ?

सज्ञनः- जसे आईने माझ्यावर संस्कार केले, तसे मी त्यांच्यावर संस्कार करीन, त्यांच्या भविष्याची चिंता मी तर करेनच, पण त्यांना सुद्धा त्यांच्या भविष्याची चिंता करायला शिकवीन,

गुरुजीः- म्हणजे हे तुमचे स्वाभाविक कर्तव्य आहे.

सज्ञनः- हो गुरुजी,

गुरुजीः-मग तुम्ही संघचालक या नात्याने संघाला आपला परिवार माना. व तुमचे स्वाभाविक कर्तव्य बजावा. मला सुद्धा जात-पात, भाषा-प्रांत, लहान मोठे, स्वयंसेवक अधिकारी असे भेद मान्य नाहीत. आपल्या गावातील संघ परिवार एकत्र येतील असे कार्यक्रम करा. असे केल्याने गुरुजींचे वाक्य संघचालकांनीच पूर्ण केले. सज्ञन म्हणाले (असे केल्याने) मला निश्चितच समाधान मिळेल.. क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## महेश काळे यांचे निधन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १९ : महेश शरद काळे(वय २५) रा.कल्याणनगर बिडकीन ता.पैठण यांचे अल्पशा आजाराने दि.१९ बुधवार रोजी सकाळी १० वाजता दुःखद निधन झाले. पार्थिवावर बिडकीन शेकटा फाटा येथील अमरधाम स्मशानभूमीत दुपारी दोन वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात आजी, आई, वडील दोन भाऊ,भाऊजाई असा परिवार असून बिडकीन येथील वृत्तपत्र विक्रेते शरद काळे यांचे ते तृतीय चिरंजीव होते.

## द बेअर हाऊससोबत पुरुषांच्या कपड्यांमध्ये क्रांती कशी घडवली

अहमदनगर - १३ मार्च रोजी सोनी लिव वर प्रसारित झालेल्या बिझनेस रिॲलिटी टीव्ही मालिकेतील शार्क टँक इंडियाच्या नवीनतम भागात, स्मार्ट कॅज्युअलमध्ये विशेषज्ञता असलेल्या समकालीन पुरुषांच्या पोशाख आणि ॲक्सेसरीज ब्रँड द बेअर हाऊसच्या सह-संस्थापकांनी - तन्वी आणि हर्ष सोमय्या - यांनी शार्क नमिता थापरकडून ३ कोटींची गुंतवणूक मिळवली आहे.

Process Paid **Sandeep M. Saraf, Advocate**
Ex. **Dhule, Dist. Dhule. (Maharashtra)**

**PUBLIC NOTICE**

**BEFORE THE MOTOR ACCIDENT CLAIMS TRIBUNAL OF DHULE OJ**
**Claim For Rs.** 20,00,000/-
**Claim Petition No.**613/2022

**Ranubai Rajendra Sonwane.**
Eh. 27/D & OB - 7
R/o.Talegaon Tal-Chalisgaon,
Dist-Jalgaon - **Applicate**

**VS-**

**2)Manik Baburao Ugale**
R/o-Sahastramuli Gardan, **Opponent**
Chikhalthana. Aurangabad
(Sambhajinagar)
(Owner of TATA ES MH-20-EG-1382)

Whereas applicants have claimed compensation U/S 166, 140 of the Motor Vehicle Act, 1988 in respect of an accident of the nature specified in Section 166 of the Motor Vehicle Act against you **No.2** You deliberately time to time evade services of notice.

Therefore, you are informed by this legal public notice that you **No. & 2** yourself or through your advocate without fail shall remain present before Accident Claims Tribunal, Dhule, Dist. Dhule, (Maharashtra) on 29/04/2025 at about 10:30 a.m. If you failed to appear on this date, Tribunal will proceed ex-parte on the presumption that you have no contention to make against the award of compensation.

Given under my hand & seal of the Tribunal this 15-01- day of 2025

Stamp

**Sd/-** **Jr.Clerk** **Sd/-** **Superintendent**

**Dist. Court, Dhule.**

## राज्यातील सर्व भागांना समन्यायी पाणी वाटप ही शासनाची भूमिका -विखे-पाटील

मुंबई, दि. १८ - राज्यातील सर्वच भागांना समन्यायी पद्धतीने पाणी वाटप व्हावे अशी शासनाची भूमिका असून कोणत्याही एका प्रदेशावर पाणी वाटपामध्ये अन्याय होणार नाही, अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी विधानपरिषदेमध्ये दिली. विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री श्री. विखे पाटील बोलत होते.

राज्यातील पाणी वाटपासाठी मेंढेगिरी समितीच्या शिफारशीनुसार पाणी वाटप करण्यात येत असल्याचे सांगून मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले की, पाणी वाटपाविषयाचे निर्णय महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या नियमानुसार केले जाते. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, नाशिक यांच्या अध्यक्षतेखील नऊ सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीने आपला अहवाल सादर केला असून त्यावर लोकांच्या हरकती मागवण्यात येत आहेत. पाण्याच्या बाष्पीभवनाचे मोजमाप करण्यासाठी रिव्हर बेसीन सिम्युलेशन सिस्टमचा वापर करण्याविषयी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास शिफारस करण्यात येईल. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पश्चिम महाराष्ट्रातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये कशा प्रकारे वळवता येईल याचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमली आहे. त्याचा फायदा मराठवाड्याला होणार आहे. कोणत्याही भागातील पाणी कमी होणार नाही अशी शासनाची भूमिका असल्याचेही मंत्री श्री. विखे-पाटील यांनी सांगितले.

## टॅलेंट सर्च एक्झामिनेशन - २३ मार्च २०२५ ची घोषणा

मुंबई : टी.आय.एम.ई. संस्थेने कॅट २०२५ड़२६ च्या इच्छुक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती चाचणी सुरू केली आहे - टी.आय.एम.ई. टॅलेंट सर्च एक्झामिनेशन ची घोषणा करण्यात आली आहे. ही परीक्षा २३ मार्च २०२५ रोजी सकाळी १०:०० आणि संध्याकाळी ६:०० अशा दोन टप्प्यात घेतली जाईल (विद्यार्थ्यांना फक्त एकाच पसंतीच्या टप्प्यासाठी नोंदणी करण्याची विनंती आहे) टी.आय.एम.ई. टॅलेंट सर्च परीक्षेत परिमाणात्मक, तार्किक आणि मौखिक क्षमतेवर बहुपर्यायी प्रश्न असतील. हे टी.आय.एम.ई. टॅलेंट सर्च परीक्षेचाकालावधी १ तास असेल. ही परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतली जाईल. १६ मार्च २०२५ ते २३ मार्च २०२५ दरम्यान नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना कॅट वर ५०००/- रुपयांची सूट मिळेल. २०२५ड़२६ अभ्यासक्रम शुल्क (अटी आणि नियम लागू). जर तुम्ही टी.आय.एम.ई. असाल तर. जर तुम्ही १६ मार्च २०२५ पूर्वीचे विद्यार्थी असाल आणि नोंदणी केली असेल, तर तुम्ही कॅट टीटीएसई सूटसाठी पात्र राहणार नाही.

**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

| | | |
|---|---|---|
| **Name and address of candidate** | : | **SANJAY KISHANRAO KENEKAR** |
| **Name of political party** | : | **Bharatiya Janata Party** |
| **Name of Election** | : | **The Maharashtra Legislative Council from the Assembly Member** |
| **Name of Constituency** | : | **The Maharashtra Legislative Council from the Assembly Member** |

**I SANJAY KISHANRAO KENEKAR,** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending Criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | XXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 9434/2020 FIR/291/2020 | Pending | U/s 188, 269 r/w 34 IPC |
| 2. | IXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 7844/2021 FIR No. 79/2021 | Pending | U/s 188 IPC |
| 3. | IXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 1688/2022 FIR No. 573/2021 | Pending | U/s 188, 269, 270 IPC |
| 4. | IXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 7674/2022 FIR No. 654/2021 | Pending | U/s 269, 270 IPC |
| 5. | XX, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 2218/2022 FIR No. 192/2021 | Pending | U/s 143, 188, 269, 270 IPC. Disaster Management Act 51-b |
| 6. | XXllth, J.M.F.C Aurangabad | SCC No. 1450/2023 FIR No. 30/2022 | Pending | U/s 269, 270 r/w 34 IPC |
| 7. | XXllth, J.M.F.C Aurangabad | SCC No. 7859/2021 FIR No. 154/2021 | Pending | U/s 143, 188, 269, 270 IPC |
| 8. | XXllth, J.M.F.C Aurangabad | SCC No. 336/2021 FIR No. 450/2020 | Pending | U/s 143, 188, 269 Of IPC U/s. 59 of Disaster Management Act |
| 9. | IXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 1479/2021 FIR No. 78/2021 | Pending | U/s 143, 147, 186, 188 of IPC |
| 10. | Matter IXth, J.M.F.C Aurangabad | SCC No. 4919/2023 FIR No. 671/2021 | Pending | U/s 269, 270 of IPC |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |

**Place : Mumbai**
**Date : 18/03/2025**

**Name & Signature of Candidate**
**(SANJAY KISHANRAO KENEKAR)**

## कार्यालय नगर परिषद पैठण

Email munptn@gmail.com
दुरध्वनी नंबर ०२४३१-२२३०१०
अवघा ज गरपरिषद/यात्रा/कावि/२०२५/४२०
दिनांक: १८/०३/२०२५

### जाहीर आवाहन

पैठण शहरातील सर्व नागरीकांना व यात्रेकरुना सूचित केले जाते की, यात्रेच्या काळात ताप, सर्दी, खोकल्याचा संसर्ग होऊ नये म्हणून खालील दक्षता व उपाययोजना करावी रोगाचा प्रसार व संसर्ग होणार नाही. यासाठी सहकार्य करावे.

१) तापेचा साथीचा उगम हा घरोघर साठवलेल्या पाण्याच्या माध्यमाने होत असतो त्या करीता दिर्घ काळातील साठवलेले पाणी काढुन टाकावे व पाण्याचा हाऊद स्वच्छ करून घ्यावा पाणी गाळून व उकळून प्यावे.
२) यात्रेकरुने व पैठण शहरातील दुकानदाराने नगर परिषदेची परवानगी घेऊनच दुकाने लावावीत.
३) विक्रेत्यांनी विक्रीच्या ठिकाणी शिळे, उघडे अन्न व सडलेला भाजीपाला, फळे विक्रीसाठी ठेऊ नये अन्न पदार्थ झाकुन ठेवावेत.
४) गोदावरी नदीत पोहण्यास सक्त मनाई आहे.
५) गोदावरी नदीच्या पात्रात पाण्यासाठी खड्डे व झरे करुन पाणी पिण्यासाठी वापरु नये.
६) हॉटेल धारकांनी पिण्याचे पाणी साठविण्याचे हाऊद, रांजण, माठ इत्यादी दररोज स्वच्छ धुऊन घ्यावेत.
७) दुकान दारांनी केर कचरा, घाण रस्त्यावर टाकु नये आपला परिसर स्वच्छ ठेवावा.
८) नागरीकांनी आपल्या घराचा परिसर स्वच्छ ठेवावा व पाण्याचे डबके तयार होऊ देऊ नयेत साचलेले पाणी काढून टाकावे व जंतु नाशक औषधाचा वापर करावा.
९) शहर स्वच्छतेसाठी सर्वतोपरी सहकार्य करावे.
१०) पाण्याचा अपव्यय टाळावा.
११) पाण्याचा वापर योग्य प्रमाणात करावा.
१२) सार्वजनिक रस्ते, खुल्या जागा इत्यादी परिसर अस्वच्छ करु नये.
१३) नाल्यामध्ये केर कचरा टाकु नये.
१४) जनावर धारकांनी आप आपले जनावरे मोकाट फिरणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
१५) आरोग्याच्या दृष्टीकोणातुन काही माहिती, मदत किंवा मार्गदर्शन हवे असल्यास पैठण ग्रामिण (सरकारी रुग्णालय) विभागाशी संपर्क साधावा.

स्वाक्षरीत/-
(संतोष आगळे)
मुख्याधिकारी तथा प्रशासक नगर परिषद पैठण

सर्व कर्मचारी वृंद नगर परिषद पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. पी.बी. पाटील, २ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. २६१/२०२५
प्रकरणात पुढील तारीख २५/०४/२०२५

अर्जदार : दिपाली भ्र. गौतम गायकवाड वय ४२ वर्षे, धंदा घरकाम रा. दिघी, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आफताब एस. शेख रा. गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट तखखख १८२७ अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार ही वरील नमुद ठिकाणची कायमस्वरूपी राहणारी असून अर्जदाराचे वडील नामे भगवान दगडु किर्तीशाही हे दिनांक २५/१०/२०२४ रोजी मौजे फुलशिवरा ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदाराची आई नामे आसराबाई दगडु किर्तीशाही ह्या बऱ्याच वषापुर्वी मयत झालेले असल्यामुळे त्यांच्या मयताबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदाराकडे उपलब्ध नाही. त्यामुळे मयत भगवान दगडु किर्तीशाही यांना अर्जदार ही विवाहीत मुलगी या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत भगवान दगडु किर्तीशाही यांच्या मृत्युमुळे अर्जदारास शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदाराने सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक १९/०३/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क.२६३/२०२५

अर्जदार :- १. कुणाल कृष्णा जाधव, वय २७ वर्ष रा. रांजणगाव धंदा खाजगी नौकरी रा. रांजणगाव शे पु. ता. गंगापुर जि. छत्रती संभाजीनगर २. उज्वला रामेश्वर जाधव वय ३४ वर्ष धंदा घरकाम रा. कसाबखेडा ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर, ३. रजनी कृष्णा जाधव वय ३४ वर्ष धंदा घरकाम रा. रांजणगाव, (शेपु) ता. गंगापुर, जि. संभाजीनगर. ४. वंदना कृष्णा जाधव, वय ५४ वर्ष, धंदा घरकाम, रा. रांजणगाव, (शेपु) ता. गंगापुर, जि. संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. बी. आर. राजपुत यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क.१ ते ३ हे आपसात सख्ये भाउ बहीन असुन अर्जदार कं. ४ ही त्यांची आई आहे. अर्जदार कं. १ ते ३ चे वडील तसेच अर्जदार कं. ४ चे पती नामे कृष्णा धोंडीबा जाधव रा. रांजणगाव शे पु ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर हे दिनांक १०/०३/२०२४ रोजी मौजे रांजणगाव शेपु ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले असुन त्यांचे पाठीमागे अर्जदार हे एकमेव वारस आहेत. मयत कृष्णा यांचे आई वडील व पत्नी हे फार आधीच मयत झालेले आहेत. अर्जदारांना शासकीय कामाकरीता ते मयताचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक १८/३/२०२५ रोजी दिले.

आदेशानुसार
सही. अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.१६५/२०२५

अर्जदार : १) विजलाबाई भ्र. शामलाल कोकरे, वय ६७ वर्षे, धंदा शेती, रा. दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) बाळु शामलाल कोकरे, वय ३८ वर्षे धंदा शेती, रा. दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) पुष्पा भ्र. ज्ञानेश्वर पुरे, वय ४३ वर्षे धंदा घरकाम रा. देवगाव रंगारी ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. वाय एन जाधव यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.२ व ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिण असुन अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ व ३ यांची जनकमाता आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील नामे शामलाल कोंडाजी कोकरे हे मौजे दायगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०८/०१/२०२५ रोजी मौजे दायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत शामलाल कोंडाजी कोकरे यांना अर्जदार क्र.१ ते ३ असे कायदेशीर वारस असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगुन शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्तीनंतरचा आक्षेप -उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. प्रकरणात पुढील तारीख दिनांक २३/०४/२०२५ रोजीची आहे.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १७/०३/२०२५ दिले.

आदेशावरून
लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. पी.बी. पाटील, २ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. के. २६५/२०२५
प्रकरणात पुढील तारीख २५/०४/२०२५

अर्जदार : १) सईदा भ्र. हबीब महंमद वय ८० वर्षे, धंदा घरकाम रा. पोस्ट ऑफीस जवळ, चमनपुरा, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) हबीब जाफर पिता हबीब मोहमद वय ५४ वर्षे, धंदा मजूरी रा. अरब गल्ली, पोस्ट ऑफीस, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) सादेक पिता मोहम्मद हबीब वय ५१ वर्षे, धंदा मजूरी रा. काली मस्जीद जवळ, चमनपुरा, गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ४) फौजीयाबेगम भ्र. तय्येब अलहामेद वय ४७ वर्षे, धंदा घरकाम रा. हिनानगर, नेहरूनगर, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद ५) रजिया भ्र. कासीम हबीब वय ४४ वर्षे, धंदा घरकाम रा. पोस्ट ऑफीस जवळ, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आफताब एस. शेख रा. गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ५ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ ही अर्जदार क्रं. २ ते ५ यांची आई आहे. अर्जदार क्रं. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ, विवाहीत बहिणी आहे. अर्जदार क्रं. १ हिचे पती व अर्जदार क्रं. २ ते ५ यांचे वडील नामे हबीब मोहम्मद अब्दुलगणी हे दिनांक ०२/०५/२०२१ रोजी मौजे चमनपुरा, गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ चे सासू सासरे व अर्जदार क्रे. २ ते ५ यांचे आजी आजोबा हे बऱ्याच वषापुर्वी मयत झालेले आहे. त्यामुळे मयत हबीब मोहम्मद अब्दुलगणी यांना अर्जदार क्रं. १ ही पत्नी व अर्जदार क्र. ४ व ५ ह्या विवाहीत मुली असून अर्जदार क्रं. २ व ३ हे मुले या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्रं. १ ते ५ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत हबीब मोहम्मद अब्दुलगणी यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक १९/०३/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज न.१६९/२०२५

अर्जदार : १) सुमनबाई भ्र. कुंडलीक को-हाळे, २) गोरखनाथ पिता कुंडलीक को-हाळे, ३) कल्याण पिता कुंडलीक को-हाळे, ४) संतोष पिता कुंडलीक को-हाळे, सर्व रा.अकोली वाडगाव, ता.गंगापुर जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.व्ही.जे. कसाने, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन कै. कुंडलीक गिरजाघर को-हाळे आणि अर्जदार नं. १ यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. २ ते ४ यांचा जन्म झालेला आहे. कै. कुंडलीक गिरजाधर को-हाळे हे दि.२५/०२/२०२२ रोजी मौजे अकोली वाडगाव, ता. गंगापुर येथे मयत झाले आहेत. मयत कुंडलीक गिरजाधर को-हाळे यांचे माघारी अर्जदार नं. १ सुमनबाई कुंडलीक को-हाळे हि विधवा, अर्जदार नं. २ ते ४ नामे गोरखनाथ पिता कुंडलीक को-हाळे, कल्याण पिता कुंडलीक को-हाळे, संतोष पिता कुंडलीक को-हाळे हे मुलगे यांचा जन्म झालेला आहे. असे कायदेशीर वारसदार आहेत. या शिवाय मयतास इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील नागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हि सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हि सायटेशन नोटीस माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १३/०३/२०२५ रोजी दिले.

आदेशावरून
लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर

संपादकीय

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# समाजकंटकांना कठोर शिक्षा व्हावी

झीरो माईल सिटी, ऑरेंज सिटी, टायगर कॅपिटल अशा अनेक विशेषणांनी जगभरात प्रसिद्ध असलेल्या नागपूर शहराच्या शांततेला नख लावणारी घटना १७ मार्च २०२५ रोजी घडली. काही समाजकंटकांच्या उपद्रवामुळे शहरात तणाव निर्माण झाला आणि प्रकरण संचारबंदी लावण्यापर्यंत पोहोचले. औरंगजेबाची कबर उखडून टाकावी, यासाठी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. त्यानंतर त्यांनी औरंगजेबाचा पुतळा जाळून प्रतीकात्मक निषेध व्यक्त केला. हे घडल्यानंतर बऱ्याच वेळाने एका विशिष्ट समुदायाचा जमाव तेथे आला आणि त्यांनी दगडफेक सुरू केली. या विषयाची माहिती पसरताच तरुणांचे दोन गट आमने-सामने आले आणि परिस्थिती बिघडायला सुरुवात झाली. महाल भागातील शिवाजी पुतळा, चिटणीस पार्क, सेंट्रल एव्हेन्यूवरील हंसापुरी, अग्रसेन चौक ते अगदी गणेशपेठच्या टोकापर्यंत हा तणाव वाढत चालला होता. दगडफेक आणि जाळपोळ सुरू झाली. काही लोकांनी गाड्या फोडल्या, जेसीबी जाळला. काही माथेफिरू तरुणांनी तर विशिष्ट समाजाच्या घरांमध्ये घुसून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. तणाव वाढत असताना पोलिसांनी आपले सहकारी जखमी होऊनदेखील संयमाने स्थिती हाताळली. या घटनाक्रमातील टायमिंग महत्त्वाचे आहे आणि काही समाजकंटकांनी या घटनेच्या माध्यमातून शहराची शांतता भंग करण्याचा जो प्रयत्न केला, त्यांना आलेले यश हा सर्वांच्या चिंतेचा विषय आहे.

अर्बनायझेशनच्या आधुनिक अर्थाने पाहिले तर नागपूर हे तसे फार जुने शहर नाही. लोकवस्ती जुन्या काळापासून होती हे खरे असले, तरी नागपूर शहर अस्तित्वात आले साधारणतः ३०० वर्षांपूर्वी. त्यापूर्वी या टापूत छोटी-छोटी गावे होती. ती एकत्र करून हे शहर अस्तित्वात आले. इंग्रजांच्या काळापासून नागपूरचे महत्त्व वाढत गेले. हे शहर मध्य प्रांत आणि वऱ्हाडची राजधानी झाले. राज्यांची भाषावार पुनर्रचना झाल्यावर नागपूरचा राजधानीचा दर्जा गेला आणि ते महाराष्ट्राची उपराजधानी बनले. मात्र, त्यानंतरही त्याचे महत्त्व कमी झाले नाही. देशाच्या मध्यभागी असल्यामुळे आणि उत्तम कनेक्टिव्हिटीमुळे हे शहर सतत विकसित होत राहिले. गेल्या दशकभरापासून नागपूर शहर अत्यंत वेगाने प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दोन्ही नागपूरकर नेते आणि त्यांचे सहकारी नागपूर शहरावर विशेष लक्ष देत आहेत. त्यामुळे नागपूरमध्ये एम्स, आयआयएम, ट्रिपल आयटी, नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, सिम्बायोसिस अशा अनेक संस्था आल्या. आणखी काही नावाजलेल्या संस्था येत आहेत. जुन्या काळापासून हे प्रामुख्याने व्यापाऱ्यांचे शहर होते. आता ते विविध प्रकारच्या उत्पादनांचे शहर बनले आहे. मॅन्युफॅक्चरिंग हब, लॉजिस्टिक्स हब, मेडिकल हब, एज्युकेशन हब अशा विविध विशेषणांनी आता या नागपूर शहराची ओळख निर्माण होते आहे. नागपुरात मेट्रो रेल्वे सुरू झाली. आयटी सेक्टर वाढले. मिहानमध्ये भरपूर कंपन्या आल्या. त्यातून रोजगार वाढले. शिक्षणाच्या संधी वाढल्या. कुशल मनुष्यबळासाठी हे शहर प्रसिद्धी पावले. देशातल्या कोणत्याही शहराची नागपूरएवढ्या वेगाने प्रगती झाली नाही. याला हे दोन नेते कारणीभूत आहेत. तसे इथले लोकही. नागपूरकर हे शांत, संयमी स्वभावाचे आहेत. पूर्वीपासूनच येथे विविध धर्मांचे, जातींचे, पंथांचे, भाषांचे लोक राहतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असलेल्या या शहरात दीक्षाभूमीही आहे. गुरुद्वारे आहेत, तशा चर्चेसही आहेत. मशिदी आहेत. निव्वळ हिंदू-मुस्लिम नव्हे तर बौद्ध, जैन, शीख, सिंधी, ख्रिश्चन, पारशी यांच्यासह अनेक धर्मपंथांचे लोक या शहरात गुण्यागोविंदाने राहत आहेत. शांततेतून स्थैर्य येते आणि स्थैर्यातून आर्थिक विकास येतो. त्यामुळेच या शहराची प्रगती मोठ्या प्रमाणात झाली. मध्य भारतातील सर्वांत मोठे शहर म्हणजे नागपूर. देशात त्याचा नंबर तेरावा. ऑक्सफर्ड इकॉनॉमिक्स रिपोर्ट असे म्हणतो की, जगातील जी पाच प्रमुख शहरे २०१९ ते २०३५ या काळात वेगाने वाढतील, त्यात नागपूर असेल. नागपूर शांत आहे. सुरक्षित आहे. त्यामुळेच ते प्रगती करीत आहे. अशा या शहराच्या शांततेला गालबोट लागत असेल तर त्यामागे कुणाचा तरी डाव आहे, षडयंत्र आहे हे निश्चित. कारण यासंदर्भात काही खटकणाऱ्या गोष्टी व्हिडीओजमध्ये टिपल्या गेल्या आहेत. उदाहरणार्थ, काही विशिष्ट घरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. काही विशिष्ट घरे नेमकी त्या घटनांच्या वेळी बंद होती. हिंदू किंवा तत्सम प्रतीके असलेल्या गाड्यांना आग लावली गेली किंवा त्याच फोडल्या गेल्या. विशिष्ट धर्माचे प्रतीक असलेले पोशाख घालून आलेले लोक अधिक आक्रमक होते. हे सारे माध्यमांनी जसे टिपले, तसे ते आजूबाजूच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्येदेखील कैद झाले असले पाहिजे. ते पोलिसांनी शोधावे आणि जो जबाबदार असेल, त्याला कठोरतम शासन होईल याची खातरजमा करावी.

नागपूर शहर संपूर्ण देशात शांततेसाठी प्रसिद्ध आहे. त्याला कारणीभूत आहे इथले लोक. त्यातले बहुसंख्य लोक हिंदू आहेत. हिंदू समाज सहिष्णू, समंजस आहे. तो आपली नोकरी-व्यवसाय करतो. हिंदूंची मुले चांगली शिकतात. आपापले काम करतात. कट्टरपंथी विचारसरणीमुळे माथे फिरलेल्या समुदायांनी अशा शहरातील वातावरणाचा फायदा घेऊन स्वतःचे जीवन सुधारले पाहिजे. पानठेला, हातठेला, टपरी, हमाली यापलीकडे वैयक्तिक विकासाचे, आर्थिक समृद्धीचे अनेक मार्ग नागपुरात उपलब्ध आहेत आणि आणखीही होत आहेत. त्याचा लाभ सर्वांनी घेतला पाहिजे. जगाची आणि देशांची अर्थव्यवस्था असते, तशी ती स्थानिकही असते. नागपूरची अर्थव्यवस्था मजबूत आहे. या शहरातील दरडोई उत्पन्न वाढते आहे. देशातील इतर मोठ्या शहरांच्या तुलनेत इथले अर्थकारणही चांगले असले, तरी हे शहर राहण्यासारखे आहे. ते शांत आणि स्वस्त आहे ही त्याची प्रमुख कारणे. आता विविध प्रकारच्या मॅन्युफॅक्चरिंगमुळे शहर संपूर्ण जगात नावारूपाला आलेले आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ, मिहान, एसईझेड, मेट्रो रेल्वे, जागतिक कीर्तीच्या शिक्षण संस्था ही सारी उज्ज्वल भविष्याची आश्वासने आहेत. त्यामुळे या शहराची शांतता टिकविणे आणि स्थैर्य कायम राखणे हे प्रत्येक नागपूरकराचे कर्तव्य ठरते. १७ मार्च २०२५ रोजी जे घडले, तसे यापूर्वी या शहरात कधीही घडले नव्हते. एखादा अपवाद वगळता दशकानुदशके जातीय किंवा धार्मिक कलहाचा प्रसंग या शहरात घडला नाही, घडत नाही. आता अचानक काही विशिष्ट लोकांना औरंगजेबाचा पुळका आला असेल तर त्यांना हुडकून काढले पाहिजे. ज्यांनी जाळपोळ, तोडफोड केली असेल, ते कोणत्याही बाजूचे असतील तरी त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले पाहिजे. एक अशीही चर्चा आहे की, हा तणाव सुरू झाल्यानंतर काही लोकांनी बाहेरून येऊन तेथे आगीत तेल ओतण्याचे काम केले. ते देखील व्हिडीओ, फोटोजमध्ये दिसतात. त्यांना शोधणे कठीण नाही. पोलिसांनी परिस्थिती शांतपणे हाताळली. खरे आव्हान पुढे आहे. ते आव्हान आहे अशा घटनेची पुनरावृत्ती टाळण्याचे. त्यासाठी पोलिसांना आपली संपूर्ण शक्ती व कौशल्य पणाला लावावे लागेल. पोलिसांची प्रतिष्ठा या घटनेमुळे पणाला लागली आहे. शांत अशा शहरात असे घडले असेल तर पोलिसांचे इंटेलिजन्स अपयशी झाले, असा ठपका लावता येणे शक्य आहे. हा ठपका पोलिसांना टाळायचा असेल तर या घटनेमागील सर्व अपप्रवृत्तींना, माथेफिरूंना, समाजकंटकांना लवकरात लवकर गजाआड करून त्यांना कायद्यानुसार शिक्षा होईल याची व्यवस्था केली पाहिजे. तात्पुरती शांतता प्रस्थापित झाल्याबरोबर, आज घडले ते उद्या पुन्हा कधीही घडणार नाही, असे समजून हा विषय सोडून दिला तर पोलिस व प्रशासनाचा मोठा दोष असेल. त्यांना आपल्या माथ्यावर दोष घ्यायचा नसेल तर दोषी शोधणे व त्यांना शासन करणे हे त्यांचे कर्तव्य आहे आणि त्यासाठी सहकार्य करणे, शहराच्या व देशाच्या हितासाठी शांतता कायम राखणे हे सर्व जाती-धर्म-पंथांच्या नागरिकांचे कर्तव्य आहे.


## प्रासंगिक

# राहुल गांधींचा निरुपयोगी 'हितोपदेश!'

राहुल गोखले

काही योगायोग विलक्षण असतात. काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे गुजरातेत बोलताना आपल्याच पक्षातील काही जणांवर तुटून पडले. गुजरात पक्ष संघटनेत असे काही नेते आहेत, ज्यांची भाजपाशी छुपी युती आहे आणि अशा किमान २०-३० जणांची हकालपट्टी करायला हवी, अशी राणाभीमदेवी गर्जना त्यांनी केली. राहुल गांधी काँग्रेसचे अनेक वर्षे उपाध्यक्ष होते आणि काही काळ अध्यक्ष होते. २००४ ते २०१४ अशी १० वर्षे हा पक्ष केंद्रात आघाडी सरकारचे नेतृत्व करीत होता आणि पक्षाची सर्व सूत्रे गांधी कुटुंबाकडेच होती, हे लपलेले नाही. आताही मल्लिकार्जुन खडगे काँग्रेसचे अध्यक्ष असले, तरी गांधी कुटुंबाला डावलून ते काहीही करू शकत नाहीत आणि इच्छितही नाहीत. असे असताना राहुल गांधी 'पक्षाच्या गुजरात संघटनेतून २०-३० जणांची हकालपट्टी करायला हवी' ही सूचना नेमकी कोणाला उद्देशून करीत होते, हे समजण्यास मार्ग नाही. २०१३ सालापासून काँग्रेसच्या राजकीय अवनतीला सुरुवात झाली. २०१४ सालच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे संख्याबळ ५० पर्यंतदेखील पोचले नव्हते. तत्पूर्वी २०१३ साली दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर राहुल गांधी यांनी आता केली अशीच राणाभीमदेवी घोषणा केली होती. ती म्हणजे 'आपण काँग्रेसमध्ये असे परिवर्तन घडवून आणू ज्याची कोणी कल्पनाही केली नसेल.' प्रत्यक्षात तसे काही घडले नाही आणि आताही गुजरातेत काही घडेल याची चिन्हे कमीच. याचे कारण पक्षातील कथित घरभेद्यांना बाहेरचा रस्ता दाखविणे हा एक भाग झाला; पण त्याने पक्षाची संघटना मजबूत होते असे नाही. त्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय स्तरावरील नेतृत्व सक्रिय असायला लागते; शिवाय प्रादेशिक स्तरावर संघटन मजबूत असणे आवश्यक असते. काँग्रेस नेतृत्वाला हे दोन्ही साधलेले नाही. गुजरातेत राहुल गांधी पक्षातील घरभेद्यांना इशारा देत असतानाच हरयाणामधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. तेथे काँग्रेसच्या वाट्याला पुन्हा अपयश आले. तेव्हा गुजरातेत राहुल गांधी यांनी केलेले विधान किती तकलादू आणि तात्कालिक आहे, हेच अधोरेखित झाले. पक्षात खरोखरच बदल करण्याची राहुल गांधी यांची मानसिकता असती तर हरयाणात त्याचा प्रत्यय आला असता. तसे घडले नाही.

गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र, हरयाणा या राज्यांत भाजपाला धक्का बसला होता. विशेषतः हरयाणात काँग्रेसने एकूण जागांपैकी निम्म्या जागा जिंकल्याने आता भाजपाची घसरगुंडी सुरू झाल्याच्या आविर्भावात काँग्रेस नेते आणि राहुल गांधी होते. पण लोकसभा निवडणुकीनंतर काहीच महिन्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला आणि त्या पक्षाचा मुखभंग झाला. त्या पराभवानंतर काँग्रेसने हरयाणात संघटनात्मक बदल



केले हे खरे; पण तेही यशस्वी ठरलेले दिसत नाहीत. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्या पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वापाशी असलेला सातत्याचा अभाव आणि नेमक्या दृष्टीची वानवा. सभेत टाळ्याखाऊ वाक्ये फेकणे निराळे; कठोर निर्णय घेण्याचा आभास निर्माण करणे वेगळे आणि प्रत्यक्षात जमिनीवरील परिस्थितीचे भान ठेवून पक्ष संघटनेत चैतन्य उत्पन्न करणे निराळे. काँग्रेसने महाराष्ट्रात प्रदेशाध्यक्षपद हर्षवर्धन सपकाळ यांना दिले. कार्यकर्ते म्हणून सपकाळ कदाचित उत्तम असतीलही; पण समोर भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसया पक्षांचे तगडे आणि मुरब्बी नेते असताना सपकाळ यांचा निभाव लागणार का हा प्रश्न उरतोच. प्रयोग म्हणून काँग्रेसने वलयांकित नावांना फाटा देऊन अपरिचित नावाला आणि बहुधा सत्तास्थानाची महत्त्वाकांक्षा (की क्षमता?) नसलेल्या कार्यकर्त्याकडे प्रदेश संघटनेची धुरा सोपविली असेलही; पण केंद्रातून नेमके दिशादिग्दर्शन होणार नसेल तर सपकाळ तरी काय करणार?

जे महाराष्ट्रात तेच हरयाणात. बी. के. हरिप्रसाद यांना काँग्रेसने हरयाणा प्रभारी नेमले खरे; तथापि त्यांच्यादेखील मर्यादा आहेत. हरिप्रसाद यांना अनुभव आहे; पण त्यांनीही नवीन जबाबदारी स्वीकारताना पक्षातील उणिवांवर उपाय शोधण्याचे सुतोवाच करण्याऐवजी निवडणूक प्रक्रिया पारदर्शी हवी इत्यादी मुद्दे मांडले. त्याने पक्ष नेतृत्वाची मर्जी ते संपादन करू शकतीलही; पण संघटन मजबूत करू शकतीलच असे नाही. हरयाणा काँग्रेसमध्ये भूपिंदर सिंह हुड्डा यांचा प्रभाव आहे, पण पक्षाला गटबाजीने ग्रासले आहे. शैलजा आणि रणदीप सुरजेवाला हे गांधी कुटुंबाच्या मर्जीतील; पण हुड्डा यांना बाजूला ठेवून शैलजा किंवा सुरजेवाला यांच्या पारड्यात गांधी कुटुंब निःसंदिग्धपणे वजन टाकू शकलेले नाही. याचे कारण, तसे केले तर हरयाणात काँग्रेसचा पुरता बोजवारा उडेल, ही भीती आहे. विधानसभा निवडणुकीच्या वेळी राहुल यांनी शैलजा आणि सुरजेवाला यांना पाठबळ दिले होते; पण हुड्डा यांना नाराज न करता. निवडणुकीतील पराभवानंतर सगळीच समीकरणे बदलली. विधानसभेत विरोधी पक्षनेता काँग्रेसला अद्याप निवडता आलेला नाही. हुड्डा यांना नाराज करून काहीही शक्य नाही, याची जाणीव असणारे आणि त्यामुळे तो धोका स्वीकारण्याची धमक दाखवू न शकलेले राहुल गांधी गुजरातेत मात्र पक्ष संघटनेतील घरभेद्यांना बाहेर काढण्याची भाषा करतात हा हास्यास्पद विरोधाभास आहे.

कठोर निर्णय घ्यायचे तर त्याची सुरुवात शीर्षस्थ नेतृत्वापासून व्हायला लागते; तर संघटनेतील अन्य स्तरांवर ती कार्यशैली झिरपते. संघटनेच्या बांधणीवर भर द्यायच्या ऐवजी रोज उठून भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर आगपाखड करण्यात वेळ आणि ऊर्जा खर्च होत असल्याने काँग्रेसचे पक्ष संघटन अधिकाधिक विस्कळीत होत आहे. त्याचाच परिणाम हरयाणात काँग्रेसला बसलेला दणका. महापौरपदाच्या निवडणुकीत १० पैकी ९ शहरांत भाजपाने बाजी मारलीच; पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असूनही विजयी उमेदवारांचे मताधिक्य लक्षणीय होते. गुरुग्राम येथे काँग्रेसची सत्ता होती; तेथे भाजपा उमेदवाराने काँग्रेसच्या उमेदवाराचा पावणेदोन लाखांच्या मताधिक्याने पराभव केला. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी अंबालाच्या महापौरांनी (हरयाणा जनचेतना पक्ष) आणि सोनिपतच्या महापौरांनी (काँग्रेस) भाजपामध्ये प्रवेश केला होता. दोघे आमदार झाले. आताच्या पोटनिवडणुकीत त्या दोन्ही ठिकाणी भाजपाला विजय मिळाला आहे.विधानसभा निवडणुकीतील पराजयानंतर काँग्रेसला यशाने पुन्हा हुलकावणी दिली आहे. वास्तविक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतूनच पक्ष संघटनेचा पाया भक्कम होत असतो. किंबहुना पक्ष किती तळागाळात पोहोचला आहे, याची तीच परीक्षा असते.भाजपाला दूषणे देत राहिल्याने कदाचित आपले नेतृत्व आक्रमक असल्याचे फसवे समाधान मिळत राहील; पण त्याने पक्ष संघटन मजबूत होणार नाही. हरयाणामधील महापौरपदाच्या निवडणूक निकालांचा तो धडा आहे. तेथेही काँग्रेस संघटनेत भाजपाशी सलगी करणारे नेते होते वा आहेत, असा जावईशोध राहुल गांधी लावू शकतील. अपयशाचे खापर फोडण्यासाठी बळीचे बकरे शोधण्यासारखी सोपी गोष्ट नसते.नेतृत्व करणाऱ्याला असला कातडीबचावपणा शोभत नाही!

९८२२८२८८१९

## वेध

विजय निचकवडे

# रेतीची ख्याती अन् नद्यांची माती!

कधी कुणाचं भाग्य फळफळेल, याचा नेम नाही. सध्या भंडारा जिल्ह्यातील रेतीची ख्याती राज्यभर गाजते आहे. तशी 'ती' आहेच चर्चा होण्यासारखी, पण होणारी चर्चा केवळ एकाच दिशेने जात असेल आणि महत्त्वाच्या मुद्याकडे दुर्लक्ष होत असेल तर ही ख्याती काय कामाची? आम्हाला महसूल, गुन्हेगारी, रोजगाराचे पडले आहे, नक्कीच हे दुर्लक्षित करण्यासारखे नाही, पण पर्यावरणाच्या होणाऱ्या ऱ्हासावर कुणीच न बोलणे जरा धाडसाचे वाटते. रेती जिल्ह्यातील असली तरी व्याप्ती राज्यभर असल्याने पर्यावरणप्रेमींचा जिव्हाळा दिसायलाच हवा!

निसर्गाने दिलेले सर्वकाही आमचेच, हा आविर्भाव कायम आमच्यात असतो. म्हणूनच तर निसर्गदत्त सगळ्या गोष्टींवर आमचा अधिकार आम्ही गाजवितो. पण हे करताना निसर्गाकडून घेताना, आपलेही त्याप्रती काही घेणे-देणे लागते, याचा विचार कधीच आमच्या मनाला शिवत नाही. आपल्याला निसर्गाकडून कसे ओरबाडता येईल, याचाच विचार कायम आम्ही करीत असतो. भंडारा जिल्ह्यातील रेती ही निसर्गाची अनमोल अशी देणगी आहे. वैनगंगा नदीच्या पात्रातील रेतीला राज्यभर प्रचंड मागणी आहे. ती एवढी की, तिची चोरी करून कोट्यवधी रुपये कमविण्याची शक्कल तस्करांनी शोधून काढली. रेतीची चोरी, अवैध वाहतूक, शासनाचा बुडणारा महसूल अशा सर्व गोष्टींवर रेती विषय आला की चर्चा होते. सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही रेती हा विषय विरोधकांकडून चघळला गेला. सभागृहात रेतीच्या विषयावर चर्चा होत असेल तर रेतीची ख्याती किती, याची कल्पना येऊ शकते. कारण हीच रेती गावापासून शहरापर्यंत अनेकांना लक्ष्मीदर्शनाचा योग जुळवून आणते.



अधिवेशनात रेती पोहोचली. वाटलं होतं, चोरी-महसूल यासोबतच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास यावरही विषय उजागर होतील; पण तसे झाले नाही. कोण किती पैसे घेतो, कोणत्या अधिकाऱ्यापासून कुणापर्यंत कमिशन पोहोचविले जाते. कोण अधिकारी रेती अवैध तस्करीत अधिक सक्रिय असतो, अशा अनेक विषयांवर चर्चा झाली. पण आमची जीवनदायिनी वैनगंगा संपते आहे, त्यावर कुणी बोलले नाही. सत्ताधारी असो वा विरोधक कुण्याही लोकप्रतिनिधीच्या तोंडून अवैध रेती उत्खननामुळे होत असलेली नदीची दुरवस्था सभागृहापुढे आली नाही. निसर्ग मागत नाही, बोलत नाही म्हणून त्यासाठी काहीच करायचे नाही, असा निर्धार आम्ही केला आहे का हो? असं असेल तर नदीजोड प्रकल्प, जलस्रोतांचे संवर्धन, पर्यावरण ऱ्हास थांबविण्यासाठी उपाययोजना करण्याचे सोंग घेण्याची गरज काय?

अवैध वाहतूक आणि चोरीने नक्कीच शासनाचा महसूल बुडतो आहे; सोबतच नदीत खोदले जाणारे खड्डे, क्षमतेपेक्षा अधिक काढली जाणारी रेती यामुळे नद्यांचे रंग-रूप बदलून त्यांची दैनावस्था होत आहे. प्रवाहित असलेल्या नद्या डबक्यांप्रमाणे झाल्या आहेत. नदीतील वाळूमुळे प्रवाहित राहणाऱ्या पाण्याचा वेग कमी होऊन भूजल पातळी वाढते; मात्र अधिकच्या उपशाने हे शक्य होत नाही. नदीत वाळूमुळे जैवविविधता निर्माण होते, जी उपशामुळे बाधित होते. परिणामी यावर अवलंबून राहणाऱ्या पशुपक्ष्यांचा आधार संपतो. अधिकचा उपसा पाण्याचा वेग वाढण्यास व नंतर पात्राचा आकार आणि वळण बदलण्यास कारणीभूत ठरते. परिणामी पावसाळ्यात पुराचा धोकाही वाढतो. एकंदरीच मोठ्या प्रमाणावर होणारा वाळूचा उपसा, नदीत यंत्राच्या मदतीने पाडले जाणारे खड्डे वनस्पती, कीटक, पाण्यातील जीव आणि मानवांसाठी घातक आहे. आम्ही केवळ आर्थिक नुकसानीचा विचार करतो. लोकप्रतिनिधींनाही आर्थिक नुकसानीचे तेवढे कौतुक आहे. विधानसभेत हीच गोष्ट स्पष्ट झाली. कारण पर्यावरणाचा ऱ्हास आणि नद्यांचे होणारे नुकसान यावर एकालाही बोलावेसे वाटले नाही. आज निसर्गाप्रती आमची हीच संवेदना असेल तर भविष्यात आजपेक्षाही विदारक स्थितीला सामोरे जावे लागेल. प्रचंड प्रमाणात वाढणारे तापमान, बदललेले ऋतुचक्र या सर्व गोष्टी निसर्गाप्रती आपल्या कर्तव्याची आठवण करून देणाऱ्या आहेत. आर्थिक नुकसानीसाठी नक्कीच आवाज उठवायला हवा, पण पर्यावरण राखणे आपली जबाबदारी आहे, हे विसरून वागणार असाल तर एक दिवस नद्या या नकाशावर दाखविण्यासाठीच शिल्लक राहतील. आणि हो, लोकप्रतिनिधी जर समजत नसतील तर त्यांना जाणीव करून देण्याची जबाबदारी ही आपलीच आहे, हे आपणही विसरायला नको!

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# मरण साखरझोपेतच आलं पाहिजे!

प्रा. दिलीप जोशी

महाकवी कालिदासांनी रघुवंशात 'मरणं प्रकृतीः' म्हटले आहे. म्हणजे मरण ही प्रकृती आहे. जन्माला आलेला जीव एक दिवस मरणारच; त्यामुळे मरण हेच शाश्वत सत्य आहे. आपल्याला मात्र या शाश्वत सत्याचा कायम विसर पडलेला असतो. यक्ष प्रश्नातही हाच प्रश्न यक्षाने धर्मराज युधिष्ठिराला विचारला आहे. त्यावर धर्मराजाचे उत्तर हेच सांगते.

**अहन्यहनि भूतानि गच्छन्तीह यमालयम्? ।**
**शेषाःस्थावरमिच्छन्ति किमाश्चर्यमतः परम्? ।**

दररोज अनेक भूतमात्र यमाच्या दारात जातात; तरीही उर्वरित आपण सर्व आपण मरणारच नाही, या भ्रमात असतात. जीवन सुखी करण्याच्या नादात आपले मरणाकडे लक्षच नसते. एखाद्या गावाला जाताना आपल्याला गंतव्याकडे नेणारी एखादी गाडी म्हणजे गंतव्य नव्हे, स्थान आल्यावर उतरावेच लागते त्या गाडीतून. पण आपण त्या देहरूपी गाडीत जीव अडकून बसलेलो असतो. आपण मग्न आणि मिथ्याभ्रमात असतो संसाराच्या. जिवाचे गंतव्य स्थान असलेल्या मरणाकडेही लक्ष असावे. मरण नैसर्गिक किंवा अकाली येऊ शकते. ते केव्हा येईल, हेही आपल्याला माहीत नसते. पण एक दिवस येणारच हे सर्वांना माहीत असते. तसं तर मरण कुणालाच नको, पण अमरपट्टा कुणाजवळच नाही. मरण येणारच आहे. नेमका त्याचा विसर पडतो आणि सुटतो स्वैर आपण. येणारे मरण सुखात येणे महत्त्वाचे. मरण सहज येणे आणि जरा दुःखात येणे यात फरक आहेच की!

साखरझोपेत येणारे मरण आपल्या सत्कर्माने येते. साखरझोप तेव्हाच येते जेव्हा आपण आनंदी, ताणतणावमुक्त, दडपणविरहित आणि भीतिमुक्त असतो. असे जगण्यासाठी ऐश्वर्याचा विवेक आणि उपभोगविषयक संतुष्टी हवी. हावरटपणाच्या नादात बहुतेक माणसे सहज मरणापेक्षा मरणयातनेला तयार असतात; पण त्यांना मरण नको असते. असे जीवन काय कामाचे? खरं सांगू, मरण साखरझोपेतच आले पाहिजे. आजकाल बहुतेकांची साखर रक्तात असते त्यामुळे त्यांना साखरझोप येतच नाही. नवीन पिढीला साखरझोप माहीतही नसेल. साखरझोप म्हणजे निश्चिंत गाढ झोप. अशी साखरझोप आहे आपल्या जीवनात? बहुतेक सर्वांचे उत्तर नकारघंटाच असेल. अशी साखरझोप येण्यासाठी तणावमुक्त जीवन असावे लागते. त्यासाठी दिवसभर ईमानदार राहावे लागते. सत्य आणि सकारात्मक वैचारिक अधिष्ठान लागते. मग त्याला पडल्या पडल्या गाढ झोप लागते. तिला म्हणतात साखरझोप!

का दूर पळते साखरझोप आपल्यापासून? आपण माणसे अशीच आहोत! विनाकारण पंचायती करायच्या, ज्याच्याशी काहीही संबंध नाही अशा नको त्या ठिकाणी नाक खुपसायचं आणि अकारण ताणतणाव ओढवून घ्यायचा. ताण आला की मेंदू थकतो. मेंदूची क्षमता नष्ट झाली की प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. प्रश्नांचा गुंता वाढतच राहतो. त्याचा परिणाम जेवण आणि झोपण्यावर होतो. रात्रभर मोबाईल! मग कसली आली साखरझोप? आपण आपल्याच हाताने तशी परिस्थिती ओढवून घेतो. दुसऱ्याच्या जीवनात सुख आले तर त्याचा आपल्या जीवनावर परिणाम होण्याचे काहीच कारण नाही. पण विनाकारण ईर्ष्या, जळाऊ वृत्ती आपल्या अंगात येते. त्याच्या सुखाने आपल्याला दुःख होते. बेचैनीमुळे रात्री मग या कडेवरून त्या कडेवर. कसली आली हो साखरझोप?

दुसऱ्याच्या जीवनातील घटनेने आपल्या जीवनात सुख किंवा दुःख येणे हा आपला नसता आगाऊपणा आहे, पण तो होतो हे सत्य आहे. तुमच्या मनाविरुद्ध कोणी तुम्हाला बोलले, तुमची निंदा केली, तुमच्या विरोधात काही कृती केली. त्यामुळे आपण खूपच अस्वस्थ असतो. एक तर समोरच्याशी संवाद साधा, त्याला धडा शिकवा किंवा त्याला सोडून द्या. शास्त्रात याला कर्म, विकर्म आणि अकर्म म्हणतात, पण हिंमत नसल्याने प्रश्न जिवंत ठेवतो आपण. आपल्यावर भिरकावलेले दगड परत त्यांच्यावर भिरकावता आले पाहिजेत अन्यथा तेच दगड वापरून आपल्या घराची भिंत बांधता आली पाहिजे. आपल्याजवळ दोन्हीही नाही. आयुष्यभर अस्थिर आणि अशांत आहोत आपण. मग कुठे येणार साखरझोप?

आपण राहतो तो परिसर, आपण जिथे व्यापार-नोकरी करतो ती आस्थापना, मित्रमंडळ, संस्था-संघटना, आपले सगेसोयरे आणि आपले कुटुंब या अधिवासात सभोवती माणसेच असतात. आपला संबंध यांच्याशीच येणार आहे. लक्षात ठेवा! परग्रहाहून कोणी एलियन नाही येणार आपल्या जीवनात. त्यातल्या त्यात काही मित्र बदलता येतील, पण शेजारी आणि सोयरा तर निश्चित आहे. तो बदलता येत नाही. आपल्या सोबत असलेल्या सर्व माणसांचे वर्तन आपल्यावर परिणाम करीत असते. वर्तन बरे असेल तर उत्तमच, पण नसेल तर चिंता वाढते. अशावेळी गोष्ट सोडून द्यायचे कौशल्यही प्राप्त करून घेता आले पाहिजे. अनुल्लेखाने टाळा, हसण्यावर घ्या किंवा त्याच्यापासून अंतर राखून वर्तन करा. मग पाहा कालांतराने लक्षात येईल की, सांप्रत समस्या आपल्या जीवनातील आनंद हिरावून घेण्याइतपत नव्हतीच मुळी. आपला मनोविकार अशांती आणि ताणतणावाला आवतन देतो; मग कसली साखरझोप? अजून सांगू! 'सत्यमेव झोंबते!' पण सांगतोच. तुम्ही अंधारात कसे वागता? याला चारित्र्य म्हणतात. आपण अंधारात कसे आहोत आणि उजेडात कसे वागतो, याचा विचार करा एकदा. आपण बहुतांश सगळे अंधारात आणि उजेडात व्यस्त प्रमाणात आहोत. आपण जे नाही ते दाखवण्याचा प्रयत्न करतो उजेडात. तो मुखवटा (पर्सोना) फाटण्याची भीती आपल्या तणावाचे महत्त्वाचे कारण ठरते. मग कसली येते साखरझोप?

आपल्यापैकी सर्वांनाच मरणाची भीती कायम सतावते. माझ कसं होईल? माझ्यानंतर कसे होईल? असे अनेक निरर्थक प्रश्न कायम घर करून असतात. लक्षात ठेवा, जन्माला आल्यापासून मृत्युबिंदूपर्यंत जीवन असते. मृत्यू ही प्रकृती आहे. मरण हमखास येणारच आहे. तोपर्यंत आनंदात जगायचं. आपले गंतव्य मोक्षप्राप्ती आहे. मोक्ष मिळण्यासाठी जे जे करावे लागते ते ते केले पाहिजे. त्यासाठी परमार्थाला पूरक स्वार्थ, परमार्थ विवेकाला पूरक संसार असावा. जन्म-दुःख,जरा-दुःख आणि नित्य-दुःख असतातच, पण त्यावर मातही करता यावी. शरीर सुदृढ आहे तोपर्यंतच आनंद अन्यथा परावलंबन कठीण आहे. आयुष्यभर सत्यमार्ग हवा. पापाचा पैसा कमवायचा, वाममार्गाने आणि भ्रष्ट मार्गाने संपत्ती जमवायची म्हणजे यातनामय मरणाला आमंत्रण आहे. तसेही वाममार्गाने आलेला पैसा वाममार्गानेच जातो. नीतीने वागणे, खरे वागणे, दुराचार आणि भ्रष्टाचाराला थारा न देणे हेच पुण्य आहे. दुसऱ्याच्या जीवनात विनाकारण डोकावणे, आपला फारसा संबंध नसताना कोणत्याही गोष्टीचा त्रास करून घेणे बंद केले पाहिजे.

'कर नाही तर डर कशाला' हे आपण नेहमीच म्हणतो. ते शक्य आहे. केवळ पोट आणि पोटाखालच्याच भागाचा विचार माणसाला पशू बनवते, पण त्यासोबतच पोटाच्या वर एक हृदय आहे; त्याला मन म्हणतात. त्याच्याही वर एक मेंदू आहे; त्याला बुद्धी म्हणतात. मन आणि बुद्धी हे माणसाचे लक्षण आहे. आपण चारित्र्यसंपन्न मनुष्य म्हणून वागण्याचा प्रयत्न करणे हा कर्तव्यभाव ठेवा. खर सांगू! साखरझोपेत मरण त्यालाच येते जो आयुष्यभर खऱ्या अर्थाने माणूस म्हणून जगतो. म्हणून म्हणतो की, मरण तर साखरझोपेतच आलं पाहिजे!

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### शांतता आणि एकता महत्त्वाची

शांतता आणि एकता या दोन्ही मूल्ये समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. शांतता आपल्याला स्थिरता आणि सुरक्षितता देते, तर एकता विविधता असूनही लोकांना एकत्र ठेवते. शांतता म्हणजे केवळ युद्धाचा अभाव नसून, ती मानसिक, सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय स्थिरतेचा एक भाग आहे. व्यक्तिगत जीवनात शांतता असेल तर समाजही आनंदी आणि सुरक्षित राहतो. शांतता टिकवण्यासाठी सहिष्णुता, समजूतदारपणा आणि संवाद महत्त्वाचे असतात. एकता म्हणजे विविधतेत सामंजस्य आणि एकोप्याने राहणे. जात, धर्म, भाषा किंवा प्रदेश वेगळे असले तरी आपल्यात एकता असेल, तर समाज आणि देश दोन्ही प्रगती करू शकतात. एकता लोकांमध्ये परस्पर सहकार्य आणि प्रेम वाढवते.

शांतता आणि एकता कसे टिकवावे? सहिष्णुता वाढवा, प्रत्येकाच्या मतांचा आदर करा आणि कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला प्रोत्साहन देऊ नका. संवाद साधा, समस्या आणि गैरसमज टाळण्यासाठी खुलेपणाने चर्चा करा. शिक्षण आणि जागरूकता योग्य शिक्षण आणि सामाजिक जबाबदारी यामुळे समाज अधिक सुसंस्कृत होतो. परस्पर मदतीच्या वृत्तीमुळे समाजात ऐक्य आणि शांतता निर्माण होते. शांतता आणि एकता या दोन्ही मूल्ये समाजाच्या आणि देशाच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत. जर आपण हे दोन घटक आपल्या जीवनाचा भाग बनवले, तर एक सुरक्षित, प्रगत आणि आनंदी समाज निर्माण होऊ शकतो.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### राज्याच्या विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प

नुकताच राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सादर केलेला राज्याचा अर्थसंकल्प हा राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी चालना देणारा आहे. एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेसाठी राज्यातील भांडवली गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढविण्यात येत आहेत. राज्यातील विविध सार्वजनिक उपक्रम, विशेष हेतू कंपन्या आणि महानगरपालिका यांच्या माध्यमातून पायाभूत सुविधांचे प्रकल्प कालबद्धरीत्या पूर्ण करण्यावर अधिक भर देणार असल्याचे म्हटले आहे. यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी गती आणि रोजगार निर्मितीसाठी राज्य सरकारने पायाभूत सुविधांकडे अधिक लक्ष देता येऊ शकेल. पायाभूत सुविधांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत विविध रस्ते विकास प्रकल्पांद्वारे भरीव भांडवली गुंतवणूक केल्याचे दिसते. पण यापूर्वी मान्यता दिलेल्या व प्रगतिपथावर असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांची पूर्तता निर्धारित कालावधीत पूर्ण होणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पात राज्यातल्या गरीब, मध्यमवर्गीय, सर्वसामान्य जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक भरीव तरतुदीची गरज आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, विद्यार्थिहित आणि शिक्षणाचा दर्जा उंचाविण्यासाठी या अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली आहे. समृद्ध महाराष्ट्राची वाटचाल, प्रगतीचा, विकासाचा ध्यास आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठीचा यंदाचा अर्थसंकल्प उपयुक्त ठरू शकतो. मागील अडीच वर्षात जो शाश्वत विकास आणि सर्वांगीण विकास झाला होता, त्याला अधिक बळकटी देणारा हा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प राज्याला विकासाच्या मार्गावर पुढे नेणारा आहे. यामध्ये पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामुळे राज्यातील युवा पिढीच्या कौशल्य विकासात भरीव वाढ होऊ शकेल. कौशल्याधारीत अर्थव्यवस्थेच्या दिशेने पुढे जाऊ शकेल. पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या तरतुदींमुळे वेगवान आर्थिक वाढ होईल. यामुळे दळणवळण यंत्रणा वाढवून व्यापारी आणि आर्थिक विकास होऊ शकेल.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### महापुरुषांच्या सन्मानार्थ अर्थसंकल्पात भरीव योगदान

महाराष्टाचे अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. त्यात आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक, संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक तसेच मुंबई येथे भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे स्मारक अर्थसंकल्पात प्रस्तावित आहे.

राज्य सरकारने आपल्या अर्थसंकल्पात या महापुरुषांच्या सन्मानार्थ जे भरीव योगदान दिल आहे, ते स्वागतार्हच आहे. सोबतच अजित पवार यांनी ३ ऑक्टोबर हा मराठी अभिजात भाषा सन्मान दिवस म्हणून साजरा केला जाईल ही घोषणा केली. मराठीस अभिजात भाषेचा सन्मान दिल्यानंतर आता ३ ऑक्टोबर हा सन्मान दिवस म्हणून साजरा केला जाणार आहे. सरकारच्या या निर्णयाने मराठी भाषिकांमध्ये आनंद व उत्साह पसरला आहे. मराठी भाषेच्या सन्मानार्थ सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे.

**अखिल देशपांडे**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉटस ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# संमिश्र

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## रत्नपूर ( खुलताबाद) शहरातील औरंगजेबाची कबर हटवा : विश्व हिंदू परिषदेची मागणी



### तहसीलदारांना निवेदन

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१७: रत्नपुर येथील हिंदुद्वेषी औरंगजेबाची कबर हटविण्यात यावी नसता विश्व हिंदू परिषद बजरंग दल तीव्र आंदोलन छेडून कार सेवा करून कबर उध्वस्त करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

गंगापूर येथील तहसीलदार नवनाथ वगवाड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,परकीय आक्रमक बाबर याचा वंशज क्रूरकर्मा औरंगजेबाची कबर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रत्नपुर (खुलताबाद) या शहरात आहे. वास्तविक, औरंगजेब यांचा मृत्यू अहिल्यादेवीनगर येथे झाला असून नंतर त्याचे शव काढून ते छत्रपती संभाजीनगर येथे दफन करण्यात आले व त्याठिकाणी त्याची कबर करण्यात आली.

औरंगजेबाने शिख गुरु तेगबहादूर यांची क्रूर हत्या केली. शिख गुरु गोविंदसिंह यांच्या दोन बाल साहेबजाद्यांना ते केवळ मुस्लिम होत नाहीत म्हणून त्यांना भिंतीत जिवंतपणी चिणून मारण्यात आले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची त्याचे वर्णन करता येणार नाही अशी भयंकर यातनामय हत्या याने केली श्रीकाशी विश्वेश्वराचे मंदिर याने फोडले,मथुरेला असणा-या सुंदर मंदिरांचा यानेच विध्वंस केला. सोरटी सोमनाथाचे मंदिर पुन्हा एकदा यानेच फोडले. त्र्यंबकेश्वर मंदिर, जेजुरी गड यावर हल्ले केले. हजारो हिंदूंच्या प्रेतांच्या राशी गावाबाहेर रचून भयानक क्रूर कत्तल केली. छत्रपती शाहू महाराजांचे अनेक वेळा धर्म परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. हिंदूंचे मोठ्या प्रमाणावर धर्मांतरण केले.

अश्या क्रूरकर्मा व आतातायी औरंगजेबाचे कुठलेही स्मारक अथवा कबर हि पूर्णपणे स्वतंत्र भारत देशात गुलामीचेच,अनंत यातनांचे प्रतिक आहे. हि कबर पुर्णपणे नष्ट करावी. परकीयांचे कुठलेही नामोनिशाण हे नष्ट झाले पाहिजे. हि कबर पूर्णपणे काढून टाकावी नसता पूर्व सुचित करुन विश्व हिंदू परिषद, बजरंग दल हिंदू समाजाबरोबर रत्नपूर (खुलताबाद) छत्रपती संभाजीनगरकडे कार सेवेसाठी कूच करतील व औरंगजेबाची कबर उध्वस्त करतील असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर जिल्हा सहमंत्री सुनील घोलप जिल्हा संयोजक ड सुभाष बोडखे विश्व हिंदु परिषद - बजरंग दल, विश्व हिंदू परिषद छत्रपती संभाजीनगर, प्रखंड मंत्री सच्चिदानंद सोमीनाथ रहाणे किशोर कुलकर्णी किशोर पवार सुनील खोचे गणेश पुरानिक आकाश शहाणे तेजस सोनवणे आदींच्या सह्या आहेत.

## २२ मार्चला कलापिनी कोमकली यांचे गायन

छत्रपती संभाजीनगर : 'स्वरदर्पण' चा पहिला शास्त्रीय संगीत कार्यक्रम २२ मार्च २०२५ रोजी संध्याकाळी ७ वाजता एमजीएम परिसरातील रुक्मिणी सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. केव्हीबी (कावेरी विठ्ठलराव भाले) फाउंडेशनच्या पुढाकाराने आणि लाइफलाइन मेडिकल डिवाइसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या सौजन्याने आयोजित या विशेष संगीतमय सोहळ्यात प्रख्यात गायिका कलापिनी कोमकली आपल्या सुमधूर आवाजात निर्गुणी भजनांचे सादरीकरण करणार आहेत. छत्रपती संभाजीनगरच्या सर्व नागरिकांसाठी हा कार्यक्रम खुला आहे.

कलापिनी कोमकली प्रतिभावान शास्त्रीय गायिका आहेत. त्यांचा आवाज दमदार आणि समृद्ध असून, आपल्या वारशाचा सखोल अभ्यास करत त्यांनी स्वत:ची स्वतंत्र संगीतदृष्टी विकसित केली आहे. त्यांचे संगीत गंभीर शास्त्रीय सादरीकरणापासून ते मालवा प्रदेशातील लोकसंगीत आणि भक्तिमय, ध्यानमय सादरीकरणापर्यंत पसरलेले आहे.

निर्गुणी भजनांमध्ये निर्गुण, निराकार परमात्म्याची स्तुती केली जाते. संत कबीर, संत रैदास आणि संत नामदेव यांच्या रचनांमध्ये यांना विशेष स्थान आहे. कलापिनी कोमकली आपल्या सुमधूर आवाजाने आणि भावपूर्ण सादरीकरणाने या भजनांना नवे आयाम देणार आहेत.

कलापिनी कोमकली या प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित कुमार गंधर्व आणि विदुषी वसुंधरा कोमकली यांच्या कन्या असून, त्यांच्या आई-वडिलांच्या संगीत परंपरेला पुढे नेत त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. छत्रपती संभाजीनगरच्या नागरिकांनी या अविस्मरणीय संगीतमय अनुभवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ग्रामीण अप्पर पोलीस अधीक्षक अन्नापुर्णा सिंह यांनी बिडकीन पोलीस ठाण्याला दिली भेट

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १९ मार्च नुकताच रुजू झालेले ग्रामीण अप्पर पोलीस अधीक्षक अन्नापुर्णा सिंह यांनी आज दि १९ मार्च रोजी पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्यात भेट देऊन पोलीस ठाण्याची पाहणी करुन कामकाजाविषयी माहिती जाणून घेतली, यावेळी बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी अप्पर पोलीस अधीक्षक अन्नापुर्णा सिंह यांना फुल गुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला, यावेळी पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, अशोक माने,मंजीत सिंग सेना, एस एस कदम, हनुमान धनवे, आदी पोलीस कर्मचारी यांची उपस्थिती होती.



**बिडकीन पोलीस ठाण्याचे अप्पर पोलीस अधीक्षक अन्नापुर्णा सिंह यांची भेट .**

## एमजीएममध्ये नॅटकॉन २०२५ राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटतर्फे 'रिडिफायनिंग हॉस्पिटीलिटी : इम्बरेसिंग सस्टेनेबिलिटी अँड टेक्नॉलॉजी इंटिग्रेशन' या संकल्पनेवर आधारित 'नॅटकॉन २०२५' या पहिल्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन शुक्रवार, दिनांक २१ मार्च २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता रुक्मिणी सभागृह येथे करण्यात येणार आहे.


या परिषदेचे मुख्य अतिथी भारतातील प्रसिद्ध शेफ तथा इंडियन फेडरेशन ऑफ कलनरी असोसिएशनचे अध्यक्ष मंजीत सिंग गिल हे असणार आहेत. यावेळी विद्यापीठाच्या वतीने कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, संचालक कपिलेश मंगल, सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित असणार आहेत. ही राष्ट्रीय परिषद शुक्रवार, दिनांक २१ मार्च २०२५ आणि शनिवार, दिनांक २२ मार्च २०२५ असे दोन दिवस असणार आहे. या राष्ट्रीय परिषदेमध्ये आतिथ्य सेवा क्षेत्रातील विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक आणि उद्योग तज्ञ हे सहभागी होऊ शकतात. तंत्रज्ञान आणि शाश्वततेच्या माध्यमातून आतिथ्य सेवा क्षेत्राला नवीन दिशा देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविला जात आहे.

या परिषदेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आणि संबंधित क्षेत्रातील तज्ञांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या परिषदेत सहभागी होण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. परिषदेसंदर्भात अधिक माहितीसाठी ७९७२८८८७०५, ८६६९१५२१७२ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

## चोरीला गेलेल्या मुर्त्यांचा शोध लागेना!जैन समाजात तीव्र नाराजी

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.१९ मार्च - कन्नड शहरातील लष्कर परिसरातील दिगंबर जैन मंदिरातून दि.८ फेब्रुवारी च्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी पंचधातूंच्या भगवान पार्श्वनाथ यांच्या तीन , भगवान मुनीसुरतनाथ , भगवान महावीर यांची एक, अशा एकूण पाच मूर्तींची चोरी झाल्याची घटना दि. ९ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली



मंदिरातील पुजारी सकाळी पूजा अभिषेक करण्यासाठी आले असता मूर्तींची चोरी झाल्याचे उघड झाले होते.मात्र या घटनेला दीड महिना उलटून गेला तरी चोरी गेलेल्या मुर्त्यांचा तपास लागत नसल्यामुळे सकल जैन समाजात तीव्र नाराजी पसरली आहे.याविषयी सकल जैन समाजाचे अध्यक्ष आनंदकुमार पांडे यांनी दैनिक तरुण भारतशी भावना व्यक्त करताना सांगितले की मंदिरात एकूण सतरा मूर्ती होत्या त्यापैकी पाच मुर्त्या चोरट्यांनी चोरून नेल्या आहे

यात मूर्तींच्या किंमती पेक्षा, त्या पंचकल्याणक संस्कार केलेल्या भगवंताच्या मुर्त्यांशी सकल जैन समाजाच्या भावना जुळलेल्या असतात,या घटनेमुळे जैन समाजात असंतोष निर्माण झाला आहे.

दीड महिन्यापूर्वी कन्नड शहर पोलीस ठाण्यात जाऊन मूर्ती चोरीची तक्रार दिली असून अजून पर्यंत भगवंतांच्या मुर्त्यांचा तपास न लागल्यामुळे सकल जैन समाजात तिव्र नाराजी पसरली असून लवकरात लवकर या मुर्त्यांचा तपास लावावा अशी मागणी सर्व समाज बांधवांकडून कडून करण्यात येत आहे.

## जागतिक स्तरावर केस प्रत्यारोपण उद्योग झपाट्याने वाढत आहे

मुंबई : जागतिक स्तरावर केस प्रत्यारोपण उद्योग झपाट्याने वाढत आहे. २०३२ पर्यंत अमेरिकन डॉलर्स १४१.८८ अब्ज इतका बाजारपेठेचा अंदाज वर्तविण्यात आला आहे, २०१८ ते २०३२ दरम्यान २५.२टक्के वार्षिक वाढ अपेक्षित आहे. तंत्रज्ञानातील प्रगती, वाढती जागरूकता आणि सेलिब्रिटी तसेच खेळाडूंच्या वाढत्या मागणीमुळे या उद्योगात मोठी वाढ होत आहे . भारतातही केस प्रत्यारोपण क्षेत्र वेगाने विस्तारत आहे आणि या परिवर्तनात यूजेनिक्स हेयर साइंसेज आघाडीवर आहे. डॉ. प्रदीप सेठी आणि डॉ. अरीका बन्सल यांनी स्थापन केलेल्या यूजेनिक्स ने आतापर्यंत १६,००० हून अधिक यशस्वी केस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण केल्या आहेत, ज्यात १,८०० पेक्षा जास्त ग्रेड ६/७ टक्कल असलेल्या रुग्णांचे उपचार समाविष्ट आहेत. त्यांच्या नैसर्गिक आणि विश्वासार्ह केस पुनर्स्थापनेमुळे यूजेनिक्स हे क्षेत्रातील सर्वोत्तम केंद्रांपैकी एक बनले आहे.

### Format C-2

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name of Political Party : Bharatiya Janata Party

*Name of Election : The Maharashtra Legislative Council from the Assembly Members

Name of State/UT : Maharashtra

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | The Maharashtra Legislative Council from the Assembly Members | SANJAY KISHANRAO KENEKAR | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | XXth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 9434/2020 Pending | FIR/291/2020 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 188,269 r/w 34 IPC Disobedience Order of Public Servant | Nil | Nil | Nil |
| | | | IXth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 7844/2021 Pending | FIR No. 79/2021 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 188 IPC Disobedience Order of Public Servant | Nil | Nil | Nil |
| | | | IXth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 1688/2022 Pending | FIR No. 573/2021 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 188, 269,270 IPC Disobedience Order of Public Servant | Nil | Nil | Nil |
| | | | IXth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 7674/2022 Pending | FIR No.654/2021 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 269,270 IPC Negligent acts like to spread infection of disease etc. | Nil | Nil | Nil |
| | | | XX, J.M.F.C. Aurangabad SCC No. 2218/2022 Pending | FIR No. 192/2021 MIDC CIDCO Police Station Aurangabad U/s 143, 188, 269, 270 IPC. Disaster Disobedience Order of Public Servant Management Act 51-b | Nil | Nil | Nil |
| | | | XXIIth, J. M.F.C Aurangabad SCC No. 1450/2023 | FIR No. 30/2022 Pundlik Nagar Police Station Aurangabad U/s 269,270 r/w 34 IPC Negligent acts like to spread infection of disease etc | Nil | Nil | Nil |
| | | | XXIIth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 7859/2021 Pending | FIR No. 154/2021 Pundlik Nagar Police Station Aurangabad U/s 143, 188, 269, 270 IPC Disobedience Order of Public Servant | Nil | Nil | Nil |
| | | | XXIIth J.M.F.C. Aurangabad SCC No. 336/ 2021 Pending | FIR No. 450/2020 City Chowk Police Station Aurangabad U/s 143,188, 269 Of IPC U/s. 59 Disobedience Order of Public Servant of Disaster Management Act | Nil | Nil | Nil |
| | | | IXth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 1479/ 2021 Pending | FIR No. 78/2021 MIDC Waluj Police Station Aurangabad U/s 143, 147, 186, 188 of IPC Disobedience Order of Public Servant & Violating of Prohibitory Order | Nil | Nil | Nil |
| | | | Matter IXth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 4919/2023 Pending | FIR No. 671/2021 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 269,270 of IPC Negligent acts like to spread infection of disease etc. | Nil | Nil | Nil |

Name of constituency : The Maharashtra Legislative Council from the Assembly Members

Place : Mumbai

Date : 18.03.2025

Signature of office bearer of the Political Party

Name and designation...

**Chandrashekhar Bawankule**

**President**

**Bharatiya Janata Party, Maharashtra**

CMYK

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## परंडा किल्ल्यावर शहाजीराजे भोसले यांची ३३१ वी जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१९ मार्च -**

स्वराज्याच्या संरक्षणासाठी महापराक्रमी शहाजीराजे भोसले यांच्या ३३१ व्या जयंतीनिमित्त व्हाईस ऑफ मीडिया पत्रकार संघटना आणि शिवप्रेमींच्या वतीने परंडा येथील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यावर अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी शहाजीराजे भोसले व जिजाऊ माँसाहेबांच्या जयघोषाने वातावरण गाजले.

परंडा किल्ला, जो एकेकाळी निजाम शहाच्या साम्राज्याची राजधानी होता. त्याने अनेक ऐतिहासिक घडामोडी अनुभवली आहेत.

१६३० मध्ये विजापुरच्या आदिलशाहने परंडा किल्ला जिंकला. परंतु शहाजीराजे भोसले यांचे या किल्ल्यावर काही काळ वास्तव्य होते. येथेच शहाजीराजे भोसले आणि जिजाऊ माँसाहेब यांचा विवाहसाखरपुडा झाला, असा ऐतिहासिक दावा केला जातो.

कार्यक्रमाच्या प्रारंभात शहाजीराजे भोसले यांच्या प्रतिमेचे पुजन प्रकाश काशीद आणि तालुका कार्याध्यक्ष प्रमोद वेदपाठक यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी तानाजी घोडके, मकरंद जोशी, डॉ. शहाजी नलवडे, विशाल काशीद, रावसाहेब गायकवाड आदी शिवप्रेमी उपस्थित होते.



# भुकंपग्रस्त भागाचा पुर्नविकास कालबध्द पध्दतीने करावा

### आ. अभिमन्यू पवारांची भेटीदरम्यान मुख्यमंत्र्यांकडे मागणी...

### मतदारसंघासह जिल्ह्यातील विषयांचा पाठपुरावा...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१९ मार्च -**

लातूर आणि नांदेड या दोन्ही ठिकाणी अपर आयुक्तालये कार्यान्वित करावीत आणि भविष्यात जिल्हा निर्मिती झाल्यानंतर दोन्ही अपर आयुक्तालयांचे रुपांतरण आयुक्तालयात करावे. लातूर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जून २०२५ पासून सुरु करण्यास मंत्रिमंडळाची मान्यता लवकरात लवकर प्रदान करण्यात यावी. तसेच सभागृहात मांडलेल्या लक्षवेधीत किल्लारी भूकंपग्रस्त भागाचा पुनर्विकास कार्यक्रम कालबद्ध पद्धतीने राबविण्यात यावा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आमदार अभिमन्यू पवार यांनी केली आहे.



लातूर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय नसल्याने अभियांत्रिकी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयातून महागडे शिक्षण घ्यावे लागते. लातूर अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु झाल्यानंतर लातूरसह धाराशिव, नांदेड व हिंगोली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. २०१६ साली भाजप सरकारने लातूर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी दिली. निधी उपलब्ध करून देऊन इमारतीचे बांधकामही पूर्ण झाले आहे.

जून २०२५ पासून लातूर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करणे गरजेचे आहे. आणि जून पासून महाविद्यालय सुरु करायचे असल्यास पूर्व तयारीसाठी वेळ मिळणं गरजेचं आहे. यासाठी मंत्रिमंडळाची मान्यता लवकरात लवकर प्रदान करण्यात यावी. लातूर आणि नांदेड या दोन्ही ठिकाणी अपर आयुक्तालये कार्यान्वित करावीत. आणि भविष्यात जिल्हा निर्मिती झाली तर दोन्ही अपर आयुक्तालयांचे रुपांतरण आयुक्तालयात करावे.

नांदेड परिक्षेत्रात राज्य राखीव पोलीस दलाचा एकही कँप नाही. त्यामुळे लातूर येथे राज्य राखीव पोलीस दलाचा कँप उभारण्यात यावा. तसेच सभागृहात मांडलेल्या लक्षवेधीत किल्लारी भूकंपग्रस्त भाग पुनर्विकास कार्यक्रम कालबद्ध पद्धतीने राबविण्यात यावा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आमदार अभिमन्यू पवार यांनी केली आहे.

या सर्वच विषयांबाबत मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून लातूरकरांना अभिप्रेत असलेले निर्णय होतील. असा विश्वास आमदार अभिमन्यू पवार यांनी यावेळी व्यक्त केला आहे. याचबरोबर औसा मतदारसंघातील विविध विकासकामांच्या उद्घाटनासाठी वेळ द्यावा, अशी विनंतीही मुख्यमंत्र्यांकडे आ. अभिमन्यू पवार यांनी केली आहे.

# गोवंशाची वाहतूक करणारी चार वाहने जप्त

### पंधरा लाखांचा मुद्देमाल जप्त... ग्रामीण पोलिसांची कारवाई...

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९ मार्च -**

शहरालगत असलेल्या मलकापूर पाटीजवळ ग्रामीण पोलिसांनी गोवंशाची निर्दयी व क्रूरपणे वाहनात डांबून वाहतूक करताना चार वाहने पकडली. वाहनांसह एकूण पंधरा लाख पाच हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चार संशयितांविरुद्ध दाखल केला आहे.



### चार संशयितांविरूद्ध गुन्हा दाखल...
### मलकापूर पाटीजवळ पोलिसांची कारवाई...

शहरालगत असलेल्या मलकापूर पाटीजवळील महाराणा प्रताप चौकात अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मंगळवारी सकाळी पोलिसांना मिळाली. त्यावरून ग्रामीण ठाण्याचे पोलिस निरीक्षक राजकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनानुसार पोलिस पथकाने चार वाहने पकडली. यात आयशर टेंपोमध्ये १७ बैल आढळले. एका ट्रकमध्ये ३, मिनी टेंपोमध्ये ७ गोऱ्हे, दुसऱ्या मिनी टेंपोत चार बैल आढळून आले. एकूण पंधरा लाख पाच हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी पोलिस कर्मचारी बालाजी गारोळे यांच्या फिर्यादीवरून संशयित गोविंद नागप्पा धर्मा (वय ३०, रा. कमठाणा, जि. बिदर), मोहसीन महेबूब सय्यद (३४, रा. वाढवणा, ता. उदगीर), हबीब हज्जू शेख (२६, रा. नळगीर, ता. उदगीर), अक्षय नरसिंग सूर्यवंशी (१९, रा. देवणी) यांच्यावर उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तपास पोलिस हवालदार तुडमे करत आहेत.

## कुलस्वामिनी आश्रम शाळेत रंगोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१९ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील श्री कुलस्वामिनी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेत शाळेच्या प्रांगणात प्राचार्य, मुख्याध्यापिका, शिक्षक व विद्यार्थी अगदी आनंदाने रंगपंचमी साजरा केली.

यावेळी प्राचार्य संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना नैसर्गिक व कोरड्या रंगाचा वापर करा.

लहान मुलांपासून ते वयोवृद्धापर्यंत सर्वांनी रंगपंचमी सण आनंदाने साजरा करा. असा संदेश दिला.

प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका आशा पवार, नागेंद्र गुरव, खंडेराव कारले, देवानंद पांढरे, अप्पासाहेब साबळे, संतोष दुधभाते, किरण ढोले, किरण कांबळे, दुर्गेश कदम, बालाजी राठोड, सागर चव्हाण, अमित खारे, शंकर चव्हाण, प्रमिला कुंचगे, कल्पना लवंद, अश्विनी लबडे, मयुरी कांबळे, सिद्राम बनसोडे आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

शेवटी जल्लोषात यावेळी विद्यार्थ्यांनी गाणी आणि नाच करुन रंगपंचमीचा आनंदोत्सव साजरा केला.

## अंधश्रद्धा एक थोतांड; महिलांनी बळी पडू नये : ना. बाबासाहेब पाटील

**तभा वृत्तसेवा**
**अहदमपूर, दि.१९ मार्च -**

समाजामध्ये काहीतरी विशेष उल्लेखनीय कार्य केले तर त्यांचा सन्मान होतो आणि सन्मान झाल्यावर त्यांच्या जबाबदाऱ्या वाढतात, असे मत सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.

अंधश्रद्धा निर्मूलन समिती स्थानिक शाखेच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'समाज प्रबोधिनी' गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या वेळेस ते अध्यक्ष पदावरून बोलत होते. माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव यांची विशेष उपस्थिती होती. डॉ. अंजली उगिले, संगीता खंडागळे, अनुराधा नळेगावकर, ब्रह्मकुमारी छाया दीदी, डॉ. पल्लवी कराड, श्रीकांत बनसोडे, वर्षा माळी, अनिता कसबे, ॲड. नाथराव देमगुंडे, भालचंद्र आलापुरे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

पुढे बोलताना नामदार पाटील म्हणाले माणसांमध्ये श्रद्धा असावी पण अंधश्रद्धा नसावी. जगामध्ये करणी, भानामती, जादूटोणा अशा प्रकारच्या कोणत्याही बाबी नसतात. या सर्व थोतांड आहेत. अशा गोष्टींच्या महिलांनी बळी पडू नये असे आवाहनही यावेळी नामदार पाटील यांनी केले.



महिला आज सर्व क्षेत्रांमध्ये आघाडीवर आहेत. यावेळी मंगल सचिन कानगुले, प्रा. इशरत पठाण, डॉ. सोनल रामटेक, प्रा. वैशाली जाधव, ललिता जाधव, वैष्णवी सोळंके, विजया श्रीमंगले, सावित्री अडकुते, सुरेखा वसंत आचार्य, गंगासागर गायकवाड, अपेक्षा डाके, प्रा. उषा काटे या महिलांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी डॉ. वृषाली किन्हाळकर यांनी 'स्त्री काल, आज व उद्या' या विषयावर व्याख्यान देताना सांगितले. कालच्या व आजच्या स्त्रीमध्ये फार बदल झाला असून मागील काळात मुलगी झाली तर नातेवाईक नाराज होत होते. परंतु सध्याच्या काळात ते चित्र फारसे दिसत नाही.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष उद्धव इप्पर, उपाध्यक्ष डॉ. अतुल खडके, प्रधान सचिव प्रा. रत्नाकर नळेगावकर, कार्याध्यक्ष मघराज गायकवाड, शिला घाटोळ, रोहिणी केंद्रे, पुनम केंद्रे, आशा रोडगे, सुरेश डबीर, अजहर बागवान, सुरेखा उपरवाड, अंजली वाघंम्बर, वैशाली कदम, पूजा गायकवाड, गोपाल पटेल यांची उपस्थिती होती.

## ग्राम साधन व्यक्तींच्या मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष

### रोहयोचे मंत्री यांना विविध मागण्यांचे निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१९ मार्च**

शिरूर अनंतपाळ तालुक्यासह जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेचे सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये ग्राम साधन व्यक्तींची जिल्हाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली निवड करण्यात आली.

ग्राम साधन व्यक्तींना वर्षभर काम मिळेल, असे सांगण्यात आले होते. मात्र, सध्या ग्राम साधन व्यक्तींना केवळ वर्षातून दोनच महिने रोजगार मिळत आहे. यामुळे ग्राम साधन व्यक्तीच्या हाताला नियमित काम मिळावे, यासाठी आमदार व खासदारांनी अधिवेशनात लक्षवेधी मांडून ग्राम साधन व्यक्तीच्या समस्येकडे शासनाचे लक्ष वेधावे, अशी मागणी होत आहे. लातूर जिल्ह्यात सामाजिक काळात अंकेक्षण प्रक्रिया पारदर्शक राबविण्यासाठी तसेच प्रत्येक जिल्ह्यासाठी १०० ग्रामसाधन व्यक्तींची जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली रोजगार हमी योजनेच्या उप जिल्हाधिकाऱ्यांकडून निवड करण्यात आली. मात्र, निवड झाल्यानंतर एका वर्षात केवळ एक ते दोनच महिने ग्राम साधन व्यक्तीच्या हाताला काम मिळाले. त्यानंतर मात्र जिल्हाधिकाऱ्यांनी निवड करून महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया पारदर्शक सोसायटी मुंबई ३२ यांच्या अधीन राहून सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेतील ग्राम साधन व्यक्तीच्या माध्यमातून नरेगामधील झालेल्या कामाचे सोशल ऑडिट करण्यात येत आहे. मात्र, हे काम वर्षांतून एक ते दोनच महिने मिळत असल्याने बाकी दिवस घरी बसावे लागते. जेव्हा की जिल्हाधिकाऱ्या मार्फत ग्राम साधन व्यक्तींची निवड करण्यात आली. त्यानुसार व रोजगार हमी योजनेच्या ब्रीद वाक्यनुसार प्रत्येकाच्या हाताला काम या शासनाच्या धोरणानुसारच सोशल ऑडिटसाठी निवड झालेल्या प्रत्येक जिल्ह्यातील ग्राम साधन व्यक्तीच्या हाताला नियमित काम देण्यात यावे, यासाठी लढा उभारण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आमदार, खासदार, विरोधी पक्षनेते, मंत्री तसेच विद्यमान रोजगार हमी योजनेचे मंत्री नामदार भरत शेठ गोगावले यांना निवेदन देवून देऊन न्यायासाठी लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू केला आहे.

ग्राम साधन व्यक्तींच्या समस्यांचा आवाज संसदेसह राज्याच्या विधीमंडळात गुंजणार काय, याकडे

## महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात वचन साहित्य व मानवी मूल्यांवर राष्ट्रीय चर्चासत्र



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९ मार्च -**

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथील कन्नड विभाग व प्रसारंगा, कर्नाटक विद्यापीठ, धारवाड यांच्या संयुक्त विद्यमाने 'वचन साहित्य आणि मानवी मूल्ये' या विषयावर एक दिवसीय आंतरशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हे चर्चासत्र २२ मार्च (शनिवार) रोजी सकाळी दहा वाजता महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडणार आहे.

या चर्चासत्राचे अध्यक्ष महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी ही राहणार असून उद्घाटन सिद्धप्पा धारवाड विश्वविद्यालय, धारवाड यांच्या हस्ते होणार आहे.

प्रमुख वक्ते अखिल भारतीय शरण साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. शंभुलिंग कामन्ना हे राहणार आहेत. कार्यक्रमाचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के. मस्के व उपप्राचार्य डॉ. एस.एन. हल्लाळे, डॉ. रमेश एच. मुलगे प्रमुख, कन्नड विभाग यांनी केले आहे.

सर्व अभ्यासक, विद्यार्थी, संशोधक आणि रसिकांना या चर्चासत्राला उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य यांनी केले आहे.

## समाजसेविका नुरजहाँ शेख यांना 'दार्शनिक लोपामुद्रा' पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१९ मार्च -**

पुणे येथील 'गांधी भवन' येथे कॉम्रेड शरद पाटील यांच्या जन्म शताब्दीनिमित्त सौत्रांत्रिक साहित्य संघाच्या पहिल्या अधिवेशनात यावेळी परंडा येथील लोकआधार साप्ताहिकाच्या संपादक तसेच समाजसेविका व सर्वहारांची भूमिका आपल्या पत्रकारितेतून मांडणाऱ्या धाडशी महिला पत्रकार नूरजहाँ शेख यांचा दार्शनिक लोपामुद्रा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.



ग्रामीण भागातील पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल हा पुरस्कार दिला गेला. प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक अक्षय इंडिकर यांच्या हस्ते मानपत्र देऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी सौत्रांतिक मार्क्सवादी विचारवंत कॉम्रेड राजकुमार घोगरे, प्रा. गणपत धुमाळे, लेखक नितीन सावंत, संस्थापक अध्यक्ष राहुल पोकळे, विजय गिते, रामप्रसाद अंभुरे, रोहीदास पवार, जयराम सांगळे यांच्यासह महाराष्ट्रातील तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, संशोधक, प्राध्यापक व उपस्थित होते.

## उदयगिरीत वन्यजीव रक्षक सोनवणे यांची सदिच्छा भेट



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९ मार्च -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्जीवन केंद्र, तागडगावचे संस्थापक सिद्धार्थ सोनवणे यांनी दुर्मिळ वनस्पती उद्यानाला भेट दिली.

सर्पमित्र, वृक्षप्रेमी, पर्यावरणस्नेही सिद्धार्थ सोनवणे यांनी स्वतःच्या मालकीची १८ एकर जमीन वन्यजीव संरक्षण व पर्यावरण संवर्धनासाठी वापरत आहेत. आजवर त्यांनी १६००० हून अधिक वन्य जीवांवर उपचार केले असून त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडले आहे. अनेक वन्यजीव सांभाळण्याचे कार्यही त्यांच्याकडून सुरू आहे. 'शहाणी माणसे इतिहासाचे वाचन करतात व वेडी माणसे इतिहास निर्माण करतात', या वाक्याचा प्रत्यय सिद्धार्थ सोनवणे यांना पाहिल्यानंतर येतो, अशा प्रकारचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांनी व्यक्त केले.

यावेळी पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयप्रकाश पटवारी यांनी महाविद्यालयातील दुर्मिळ वनस्पतीची माहिती सिद्धार्थ सोनवणे यांना दिली. महाविद्यालयाच्या या उपक्रमाबद्दल सिद्धार्थ सोनवणे यांनी देखील समाधान व्यक्त केले. सिद्धार्थ सोनवणे यांच्या वन्यजीव संरक्षण व पर्यावरणपूरक कार्याची दखल घेऊन महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे, डॉ. जयप्रकाश पटवारी, रेणापुर येथील वृक्षमित्र शिवशंकर चापुले यांची विशेष उपस्थिती होती.

## वैद्यकीय क्षेत्रातील असामान्य कार्यकृतत्व म्हणजे मेरी लास्कर होय : मस्करणीस

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९ मार्च -**

चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत कर्करोगाच्या औषधाचे संशोधन करावया शासनाला भाग पाडणाऱ्या मेरी लास्कर यांच्या जीवन चरित्रावर सुंदर असा वाचक संवाद संपन्न झाला.

अमेरिकेतील मेरी लास्कर या काही डॉक्टर, संशोधिका किंवा राजकीय व्यक्ती नसल्या तरी त्या आरोग्याशी निगडित समस्येमुळे अस्वस्थ होत्या. लास्कर

कार्य करीत राहिल्या. गरजेपोटी दानशूर व्यक्तीकडून वर्गणी गोळा करायच्या. प्रसंगी राजकीय लोकांना जाब विचारत या सामान्य स्त्रीने आरोग्य आणि कर्करोगाशी निगडित वैद्यकीय क्षेत्रातील असामान्य कार्यकृतत्व म्हणजे मेरी लास्कर होत, असे विचार पुणे येथील आयटी तज्ज्ञ व साहित्यिक मा. डॅनिअल मस्करणीस यांनी व्यक्त केले. उदगीर येथील



डॅनिअल मस्करणीस यांनी मेरी लास्कर या स्वलिखित पुस्तकावर संवाद साधून गुंफले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकमत टाइम्सचे पत्रकार डॉ.धनाजी कुमठेकर हे उपस्थित होते.

पुढे बोलताना मा. डॅनिअल मस्करणीस म्हणाले, मेरी लास्कर यांच्या प्रयत्नामुळे अमेरिकेत विविध आजारावर कार्य करणाऱ्या लास्कर फाउंडेशनच्या उपयोग केवळ अमेरिकेतील लोकांनाच नाही, तर जगातील शेकडो लोकांच्या आरोग्यासाठी होत आहे.

आज आरोग्याशी निगडित कार्य करण्यासाठी संस्था आहेत, परंतु समाज व राजकीय लोकांचे पाठबळ त्यांना नाही. निधी कमी पडत असल्यामुळे या संस्थेमार्फत समाधानकारक संशोधन होत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत मेरी लास्कर यांनी आरोग्यासाठी केलेले कार्य विचार करायला लावणारे आहे.

प्रश्न विचारले त्यास संवादकांनी अतिशय वस्तुनिष्ठपणे समाधानकारक उत्तर देत श्रोत्यांना अंतर्मुख केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्य संयोजक अनंत कदम, आनंद बिरादार, तुळशीदास बिरादार, डॉ.कांत जाधव, मुरलीधर जाधव, प्रा. राजपाल पाटील, सुरेश वजनम आदींनी प्रयत्न केले. कार्यक्रमास उद्योजक रमेश अंबरखाने, डॉ. संग्राम पटवारी आदींसह अनेक मान्यवर, विद्यार्थी, पत्रकार, वाचक, बंधू-भगिनी

# जिल्हा कृषी व धान्य महोत्सवात ५० लाख रुपयांपेक्षा अधिक शेत मालाची थेट विक्री

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१९ मार्च**

महाराष्ट्र शासन, कृषि विभाग व रोटरी क्लब, नांदेड यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित २ दिवसीय जिल्हा कृषी व धान्य महोत्सव १७ व १८ मार्च २०२५ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती मैदान, नवा मोंढा, नांदेड येथे संपन्न झाला. या महोत्सवास नागरिक, ग्राहक उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून या दोन दिवसात ५० लाख रुपयांपेक्षा अधिक विक्री झाली असल्याची माहिती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी दिली आहे.



जिल्हा कृषी व धान्य महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रामध्ये शास्त्रज्ञ शेतकरी परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादात कृषी विज्ञान केंद्र पोखरणी येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. देविकांत देशमुख यांनी शेतातील आधुनिक तंत्रज्ञान हवामान बदल व शेती पुढील आव्हाने या विषयावर सविस्तर असे मार्गदर्शन केले. कृषी विज्ञान केंद्र सगरोळी येथील शास्त्रज्ञ डॉ. माधुरी रेवनवार यांनी पौष्टिक तृणधान्याचे आहारातील महत्त्व आणि प्रक्रिया तसेच महिलांना उद्भवणारे आजार त्यावरील उपाय योजना याविषयी माहिती दिली. केळी संशोधन केंद्र नांदेड येथील प्रभारी अधिकारी डॉ. शिवाजीराव शिंदे यांनी केळी पिकाची आधुनिक पद्धतीने लागवड व निर्यातक्षम केळी उत्पादन यावर सविस्तर मार्गदर्शन करून निर्यातीसाठी येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाय योजना याविषयी मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व रोटरी क्लब, नांदेड यांचे संयुक्त विद्यमाने नांदेड जिल्हा कृषी व धान्य महोत्सवाच्या आयोजन करण्यात आले होते. १८ मार्च २०२५ रोजी समारोपीय कार्यक्रम संपन्न झाला. समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त कृषी संचालक तथा रोटरी क्लब नांदेडचे सचिव सुरेश अंबुलगेकर तर प्रमुख पाहुणे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, कृषी उपसंचालक हरिराम नागरगोजे, उपविभागीय कृषी अधिकारी नांदेड अनिल शिरफुले, किनवटचे राजकुमार रणवीर, देगलूरचे विठ्ठल गीते, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे सेवानिवृत्त शिक्षण विस्तार संचालक एस. डी. मोरे, कृषी विज्ञान केंद्र पोखरणी येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर देविकांत देशमुख, कृषी विज्ञान केंद्र सगरोळी येथील शास्त्रज्ञ डॉक्टर माधुरी रेवनवार, केळी संशोधन केंद्र नांदेड येथील प्रभारी अधिकारी डॉक्टर शिवाजीराव शिंदे आदींची उपस्थिती होती.

महोत्सवामध्ये मालेगावचे शेतकरी भगवान इंगोले, चिखली बु. चे सत्यनारायण मंत्री , मनाठाचे संजय सूर्यवंशी, सुनिता कावळे, दापशेडचे विश्वनाथ होळगे, वाडी बु चे व्यंकटराव पावडे आदींनी मनोगत व्यक्त केले व महोत्सव दरवर्षी व्हावा जेणेकरून जिल्ह्यातील सर्व प्रगतशील शेतकऱ्याचे गेटटुगेदर होईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

महोत्सवाच्या समारोपीय कार्यक्रमांमध्ये ८३ स्टॉलधारक तसेच कृषी विभागातील उत्कृष्ट कामकाज करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. महोत्सवामध्ये ८३ स्टॉलमध्ये शेतकरी, महिला बचतगट, विविध कंपन्यांचे स्टॉल आदीं ११७ विक्रेत्यांनी आपल्या शेतमाल व साहित्याची मांडणी करून विक्री केली. महोत्सवामध्ये विविध प्रकारचा शेतमाल जो शहरात सहजासहजी उपलब्ध होणार नाही जसे की हातसडीचे तांदूळ, काळे गहू, खपली गहू, डाळीमध्ये तुर, मुग, उडीद, मसूर, ज्वारी, विविध प्रकारची फळे जसे की टेंबरे, विविध जातीची आंबे, नर्सरीची रोपे यांची ५० लक्ष रुपयांची विक्री झाली. कृषी विभागासह इतर विभागातील अधिकारी कर्मचारी त्याचबरोबर नांदेड शहरातील नागरिक यांनी शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदीस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महादेव पिंपळगाव तालुका अर्धापूर येथील शेतकरी मुगाजी कामाजी कल्याणकर यांच्या दुग्धजन्य पदार्थाची कुल्फी, खवा, कलाकंद, आदी पदार्थांची दोन दिवसांमध्ये ५० हजार रुपयांची विक्री झाली. कामठा बु. येथील महानंदा कल्याणकर यांचे सेंद्रिय टरबूज हे ग्राहकांचे खास पसंती ठरली. तालुका कृषी अधिकारी कार्यालय लोहा यांनी तयार केलेले पाणलोटाचे मॉडेल व नंदकिशोर गायकवाड भोसी तालुका भोकर येथील शेतकऱ्यांचा मियाझाकी या आंब्याचे प्रदर्शनामध्ये खास आकर्षण होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी सहाय्यक वसंत जारीकोटे तर आभार प्रदर्शन उपविभागीय कृषी अधिकारी किनवट राजकुमार रणवीर यांनी केले. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी कृषी विभागातील तंत्र अधिकारी के एम जाधव, मेरगेवार, प्रमोद गायके, संदीप स्वामी, सर्व तालुका कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक लक्ष्मण हांडे, नितीन नाईक, आदींसह कृषी विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त



### मुगट येथील ग्राम दरबार कार्यक्रमाला गावकऱ्यांची दांडी

**मुदखेड**-दि.१२ रोजी मुगट येथील तंटामुक्ती भवनात ग्राम दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. परंतु गावातील लोकांना या कार्यक्रमाची पुर्व सुचना ग्रामपंचायत कडून न मिळाल्याने या कार्यक्रमाला गावातील लोकांनी माहिती अभावी पाठ फिरवली आहे.त्यामुळे ग्राम दरबार हा कुणासाठी आयोजित केला होता हा प्रश्न उपस्थित होत आहे. शासनाच्या व विभागीय आयुक्त यांच्या आदेशानुसार ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती व्हावी. त्यांना या योजनांचा लाभ घेता यावा. नागरिकांच्या विविध योजना संबंधित अडचणी सोडवण्यासाठी मदत व्हावी. या हेतूने ही योजना सुरू करण्यात आली आहे.या योजनेचे पुर्वी चे नाव शासन आपल्या दारी अता ते बदलून ग्राम दरबार असे देण्यात आले आहे.मुदखेड तालुक्यातील मुगट येथे दि.१२रोजी सकाळी ११ वाजता ग्राम दरबाराचे आयोजन करण्यात आले होते.मुदखेड तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायत सदस्य,हे उपस्थित होते.हा कार्यक्रम गावातील नागरिकांसाठी आयोजित केला होता ते मात्र यात सहभागी झाले नाही. ग्रामपंचायत व गावातील नागरिक यांच्यात समन्वय दिसून आला नाही. ग्रामपंचायत सदस्य व गावातील नागरिकांना ग्राम दरबार असल्याची नोटीस त्याच दिवशी दिनांक १२ रोजी सकाळी ०९ वाजता गावात फिरत असल्याचे दिसून आले. गावात कसले प्रकारची दवंडी किंवा दोन दिवस पूर्वी सूचना गावातील लोकांना देण्यात आली नाही. ग्राम दरबार हा तंटामुक्ती भावनात आयोजित केला त्यामुळे आलेल्या कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती.शासनाकडून जाहिरातीवर लाखो रुपयांची उधळण करून सुद्धा सर्व सामान्य नागरिकांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचत नाहीत म्हणून पुन्हा एकदा शासनाने ही ग्राम दरबार ही योजना सुरू केली असावी. परंतु शासनाने पुन्हा नागरिकांना हितासाठी योजना सुरू करुन सुध्दा जर त्या योजने पासून नागरिकांना वंचित ठेवले जाते, त्यांच्या पर्यंत ही माहिती जात नसेल तर यास जबाबदार कोण? असा प्रश्न लोकांच्या मनात निर्माण होने सहाजिकच आहे.

### महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह राष्ट्रीय जलदिन घोषित करण्याच्या मागणी

**नांदेड**-सन २० मार्च १९२७ ला महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथील चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रह



करुन ऐतिहासिक क्रांती केली. ही क्रांतीकारी घटना सदोदित स्मरणात रहावी याकरीता सरकारने हा दिवस राष्ट्रीय जलदिन म्हणून घोषित करावा या मागणीसाठी २० मार्च २०२५ रोजी नांदेडच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती संयोजक महेंद्र पिंपळगावकर यांनी दिली. २० मार्च १९२७ ला महाडच्या चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी मिळावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ऐतिहासिक सत्याग्रह केला. भारताच्या इतिहासातील माणुसकी आणि समानतेचा संदेश देणारा दिवस म्हणजे २० मार्च होय. जातीभेद, भिक्षूकशाही, सामाजिक गुलामगिरी या विरुद्ध बंड उभारुन बाबासाहेबांनी हजारो अस्पृश्य लोकांना सोबत घेत चवदार तळ्यावर सत्याग्रह केला. जे पाणी पिण्यास गुराढोरांना मुभा होती, परंतु अस्पृश्यांना मात्र पिण्यासाठी पाणी वापरु दिल्या जात नव्हते. सामाजिक चिड आणणाऱ्या या बाबीचा प्रखर विरोध करत चवदार तळ्यावर मोठी जलक्रांती झाली. या घटनेची नोंद इतिहासात कायमस्वरुपी व्हावी म्हणून हा दिवस राष्ट्रीय जलदिन म्हणून घोषित करावा अशी मागणी सातत्याने करण्यात येत आहे. आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते महेंद्र पिंपळगावकर यांनी या मागणीसाठी आत्तापर्यंत अनेकदा अर्ज, विनंत्या केल्या आहेत. २० मार्च हा चवदार तळ्याचा सत्याग्रह दिन आहे. अजून दोन वर्षाला या ऐतिहासिक घटनेचे शताब्दी वर्ष सुरु होईल. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राष्ट्रीय जल दिन घोषित करण्याच्या मागणीसाठी धरणे आंदोलन करण्यात येणार आहेत. या आंदोलनात आंबेडकरी अनुयायांनी आपला सहभाग नोंदवावा अशी विनंती संयोजक पिंपळगावकर यांनी केली आहे.

### गजराबाई पाटील झरीकर यांचे निधन

**देगलूर**-तालुक्यातील झरी येथील प्रतिष्ठित महिला नागरिक श्रीमती



गजराबाई गोविंदराव पाटील झरीकर यांचे वृद्धापकाळाने मंगळवार दि.१८ रोजी रात्री १० वाजून १५ मिनिटांनी देगलूर येथील त्यांच्या निवासस्थानी दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ९१ वर्षे होते. त्यांच्या पार्थिवदेहावर बुधवारी दि. १९ रोजी दुपारी ३ वाजता झरी ता. देगलूर येथील त्यांच्या शेतात अंतिमसंस्कार करण्यात आले. श्रीमती गजराबाई पाटील ह्या विधान परिषदेचे माजी आमदार गोविंदराव पाटील झरीकर यांच्या पत्नी तर रमेश गोविंदराव पाटील झरीकर व माजी जिल्हा परिषद सदस्य उमेश गोविंदराव पाटील झरीकर यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात दोन मुले,दोन मुली, सुना, जावई,नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# मुदखेड तालुक्यात अवैध वाळू उपसा जोमात; प्रशासन मात्र कोमात

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.१९ मार्च**

गेल्या अनेक दिवसा पासुन प्रसार माध्यमातुन बातम्या प्रकाशीत करून सुद्धा महसुल प्रशासनाला जाग आली नाही त्यामुळे वाळू माफियांकडून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू तस्करी करण्यात येत आहे.

वाळू माफीयांचे नेटवर्क जागोजागी प्रत्येक चौकात थांबून लोकेशन देत असतात यामध्ये चार चाकी वाहन एसी कारमध्ये बसुन वाळू माफिया प्रत्येक चौकामधून त्यांना लोकेशन देत असतात होळकर चौक, ठाकरे चौक, बारड रोड, या ठिकाणी वाळू माफियांनी ठेवलेले रोजदार हे त्यांना लोकेशन देतात एवढे पाहुन सुद्धा महसुल प्रशासन झोपीचे सोंग घेतात कि काय? अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. अवैध वाळू वाहतूक तस्करी जोमात आहे तर महसूल विभाग कोमात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. अवैध वाळू वाहतूक करणारे टीपरचे नंबर फ्लेट प्रशासनाला ओळखता येऊ नये म्हणुन त्यावर काळे वारणीस लाऊन सुसाट वेगाने धावत आहेत. एरवी सामान्य वाहन चालकास दंड आकारून प्रादेशिक परिवहन कार्यालय हे आपण काम करत असल्याचे दाखवतात परंतु बिना नंबर प्लेट रेतीचे वाहतूक करणाऱ्या सुसाट वाहनावर कारवाई करण्यासाठी मात्र प्रादेशिक परिवहन कार्यालय कुठेही कार्यवाही करताना दिसत नाही. अवैध वाळू उपसा रात्री बे रात्री सरासपणे होता परंतु आता दिवसा ढवळ्याही अवैध वाळू वाहतुक तस्करी करताना मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे आणि प्रशासन या गंभीर समस्येकडे किती दुर्लक्ष करीत आहे ? माध्यमांकडून संबंधित प्रकरणाच्या बातम्यांचा प्रसारित करण्याचा ओघ जरी असला तरी प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे, यामुळे वाळू माफियांना वाव मिळत आहे आणि ते सर्रासपणे वाळू तस्करी करत आहेत. स्थानिक महसूल प्रशासनाची वाळू माफियांना अर्थ:पूर्ण मूकसंमती? असल्याची चर्चा तालुक्यात होत आहे.

> मुदखेड तालुक्यात अवैध गौण खनिज व वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनांकडून अनेकदा अपघात होण्याचे घटना घडल्या आहेत त्यातच दिनांक १५ मार्च रोजी महाटी माळकोठा दरम्यान एका हायवाने बसला धडक दिली असल्याचे बोलल्या जात आहे यामध्ये बसचे नुकसान झाले असून हायवा चालक त्या ठिकाणाहून प्रसार झाला आहे.सदरील बसचे वाहक यांच्या पाय जखमी झाला असून, त्यांना उपचारासाठी नांदेड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सदरील अपघातामध्ये बसचे मोठे नुकसान झाल्याचे समजते.

# लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा : दिलीप शिंदे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१९ मार्च**

शासकीय पातळीवरच्या सेवा नागरिकांना वेळेत देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्या तयार करण्यात आला आहे. नागरिकांना त्यांच्या सेवा वेळेत मिळणे हा त्यांचा हक्क आहे. या सेवा नागरिकांना वेळेत देण्यासाठी शासकीय यंत्रणांनी लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश महाराष्ट्र आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यांनी दिले.



माहूर येथे भेट देवून शासकीय विश्रामगृह माहूर येथे त्यांनी आढावा बैठक घेतली. यावेळी ते बोलत होते. यावेळी माहूरचे तहसीलदार राजकुमार राठोड, किनवट तहसीलदार शारदा चोंडेकर, माहूर/ किनवटचे गटविकास अधिकारी सुरेश कांबळे, मुख्याधिकारी माहूर विवेक कांदे, मुख्याधिकारी किनवट अजय कुरवाडे, माहूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे आदींची उपस्थिती होते.

सर्व कार्यालयामध्ये लोकसेवा हक्क अधिनियमाचे नोटीस बोर्ड असणे आवश्यक असून ते लावण्याच्या सूचना आयुक्त दिलीप शिंदे यांनी दिल्या. लोकसेवा हक्क अधिनियमाची नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी यादृष्टीने सर्वांनी प्रयत्न करावेत. प्रत्येक विभाग प्रमुखांनी दर महिन्याला आढावा बैठक घ्यावी. कर्मचाऱ्यांसाठी आरटीएसचे प्रशिक्षण ठेवावे. कार्यालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांवरती आरटीएसचा लोगो असणे अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच कार्यालयानी ऑनलाईन सेवा देण्यावर भर देवून ऑफलाईन सेवा देणे बंद कराव्यात, अशा सूचना त्यांनी कार्यालय प्रमुखांना दिल्या. तसेच त्यांनी यावेळी क्षेत्रीय अडचणीही जाणून घेतल्या.

# नंदिग्राम ग्रह निर्माण सहकारी संस्थांच्या सभासदांना सोयी सुविधा पुरविणार : दासराव पुयड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१९ मार्च**

नंदिग्राम गृहनिर्माण सहकारी संस्था ही नांदेड शहरातील जुनी व मोठी संस्था असून क्षेत्रफळाने ४० ते ४५ एकर मध्ये नांदेड शहराच्या संस्था कार्यरत आहे. या संस्थेत जवळपास ५९० सभासद असून यामध्ये काही जमिनीची तांत्रिक अडचणीमुळे सभासदांना भूमाफिया कडून त्रास होत आहे. तो होणारा त्रास राज्याचे उपमुख्यमंत्री श्री अजित दादा पवार सहकार मंत्री बाबासाहेब पाटील वलोकनेते माननीय आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या माध्यमातून संस्थेच्या सभासदांना होणाऱ्या अडचणी सोडवण्याच्या पुरेपूर प्रयत्न करणार व बिल्डर कडून अवैध बांधकाम करून संस्थेचे नियमाचे पायमल्ली करत आहे त्यांच्यावर ही नियमाप्रमाणे कडक कारवाई करणार येईल. संस्थेमधील रस्ते पाणी, वीज, मल निसारण (ड्रेनेज) इत्यादी विविध समस्याचे माननीय जिल्हाधिकारी



व महापालिकेचे आयुक्त यांच्या माध्यमातून समस्या सोडविण्याचा निर्धार अध्यक्ष दासराव पुपयेड यांनी केला आहे. सहकार कायदा १९६० व १९६२ अंतर्गत संस्थेच्या माजी अध्यक्षांवर कलम १४६ (बी) कायद्यान्वये उपनिबंधक कार्यालयात कारवाई चालू आहे. या कारवाईच्या पाठपुरावा करणार संस्थेतील यापुढे अवैध बांधकाम बिल्डर लॉबीला आळा घालणार यापुढे संस्थेच्या कारभार पारदर्शकपणे करण्यात येईल असे संस्थेचे नूतन अध्यक्ष दासराव पुयड यांनी सांगितले आहे.

# ऊस उत्पादकांनी २३ मार्च पुर्वीच ऊसाचा पुरवठा करावा अन्यथा गाळप हंगाम बंद होणार !

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.१९ मार्च**

उमरी व्ही पी के समुह कारखाण्यानी ऊस उत्पादक शेतकऱ्याना जाहीर सुचना देत २०२४ - २०२५ गाळप हंगाम संपणार असुन २३ मार्च पुर्वीच कारखाना व्यवस्थापन समिती किवां चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी यांच्याशी संपर्क साधावा अन्यथा ऊस गाळप हंगाम मुदत संपल्या नंतर बंद होणार असल्याची माहिती जाहीर प्रसिद्धी सुचना शेतकऱ्याना देण्यात आले आहे .



व्ही.पी.के उद्योग समूहाच्या अंतर्गत येणाऱ्या एम. व्ही.के व्ही. पी.के व डॉ. शंकरराव चव्हाण जागरी या ऊस गाळप कारखान्यांच्या कार्यक्षेत्र आणि उमरी, धर्माबाद, नायगाव, भोकर आणि नांदेड, हदगांव, हिमायतनगर, कंधार, मुखेड, बिलोली तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची सूचना जारी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना कळवण्यात येत आहे की, गाळप हंगाम २०२४ - २०२५ दि. २३ मार्च २०२५ च्या दरम्यान गाळप हंगाम संपत आलेला आहे, आणि त्यामुळे सध्या चालू असलेला व्ही.पी.के कारखाना व्यवस्थापनाने हंगामाची समाप्तीपूर्वी गाळप बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

व्ही.पी.के उद्योग समूहाने च्या गाळप हंगामाची अंतिम मुदत २३ मार्च २०२५ ठरवली आहे. या कारणास्तव, २२ मार्च २०२५पर्यंत ऊसाचा गाळप संपविण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांना सूचित करण्यात येत आहे की, त्यांच्या शेतातील ऊसाचा गाळप २३ मार्चपूर्वी पूर्ण होईल याची काळजी घ्यावी. ज्या शेतकऱ्यांचा ऊस शिल्लक आहे त्यांनी कारखान्याशी संपर्क साधून त्यांच्या उसाची माहिती द्यावी.

शेतकऱ्यांना कळवण्यात येत आहे २२ मार्च २०२५ पर्यंत शेतकऱ्यांनी त्यांचा राहिलेला ऊस गाळपासाठी कारखान्याशी संपर्क साधून, आपला शिल्लक ऊसाचे गाळप कारखान्यापर्यंत पोहोचवावे अन्यथा, शिल्लक उसाची जबाबदारी कारखान्यावर राहणार नाही. यामुळे शेतकऱ्यांनी लक्ष देऊन, वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन कारखान्याच्या प्रशासनाने केले आहे. व्ही.पी.के उद्योग समूहाचे कार्यक्षेत्र उमरी, धर्माबाद, नायगाव, भोकर आणि नांदेड, हदगांव, हिमायतनगर, कंधार, मुखेड, बिलोली तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील उसाचे गाळप कार्य पूर्ण करण्यासाठी, योग्य वेळेत कारखान्याशी संपर्क साधावा, अन्यथा शिल्लक उसाची जबादारी ही स्वतःची राहील याची नोंद घ्यावी असे ही जाहीर सुचना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात आले आहे .

# महाबोधी बुद्ध विहार बौद्ध भिक्कुंच्या ताब्यात देण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.१९ मार्च**

देशातील जम्मु-काश्मीरची ३७० कलम हाटवुन त्याला स्वायत्तता दिली तशी बुद्धगया येथील महाबोधी बुध्द विहार बौध्दाच्या ताब्यात द्या अशी रिपाइं (आठवले) गटाने राष्ट्रपती यांच्याकडे निवेदन देऊन मागणी केली आहे.



ट्रस्टी १९४९ च्या कायद्यानुसार या विहाराची देखभाल करण्यासाठी पाच ब्राह्मण तर चार बौद्ध भिक्कू विहाराची देखभाल करतात.महाबौध्दी विहारावरील इतर धर्मीयाने अतिक्रमण करुन ज्ञानार्जन करण्याऐवजी अंधश्रद्धा पसरविण्याचे काम करतात यामुळे समुळ बौध्दधर्मिय देशात अशांतता निर्माण झाली आहे.

बौद्ध भिक्कु संघाने घटनास्थळी उपोषण सुरू केले आहे. याच धर्तीवर संबंध देशात उपोषण करण्यात येत आहेत केंद्र सरकारने जम्मू कश्मीर मधील ३७० कलम हटवली आहे त्याच धर्तीवर बिहारमधील महाबोधी विहारासाठी १९४९ चा ट्रस्टी कायदा रद्द करून बुद्धगया येथील महाबोधी विहार बौद्ध भिक्कु संघाच्या ताब्यात देण्याची मागणीचे निवेदन देशाच्या राष्ट्रपतीकडे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाच्या वतीने बालाजी धनसरे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.यावेळी लोहा तालुका अध्यक्ष सुरेश महाबळे ,चांदु जाधव, दशरथ धनसडे, विश्वनाथ कांबळे, दत्ता सशाने यांच्या वतीने तहसीलदार विठ्ठल परळीकर याना निवेदन देण्यात आले.

# रंगा ऐवजी फुलांची होळी


**तभा वृतसेवा**
**तामसा, दि.१९ मार्च**

पर्यावरण मुक्त होळी हा अनोखा उपक्रम तामसा येथे गोपाळ कृष्ण मंदिरात फुलांची होळी साजरी केली जाते. बाळ, गोपाळ, राधा, राणीची वेशभूषा परिधान करून त्यांच्या सोबत फुलांची पाकळ्या उधळून होळी उत्सव साजरा होतो. साध्वी रूपा ताई अमृते, अर्चनाताई अमृते, ममता जोशी, ललिता कदम, आशाताई भोकरे, रूपाली भायेकर, संगीता पौळ, सुनिता वास्कर, अनिता भास्कर, गीता भायेकर, पूजा अग्रवाल यासहित असंख्य महिलांनी सहभाग घेतला.

# सहा आरोपींना अटक; ४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.१९ मार्च**

ग्रामीण पोलीसांनी दि. १७ मार्च रोजी ६ आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून ३ लाख ८५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या फल्श आऊट अंतर्गत ग्रामीण पोलीसांनी गोपनिय माहितीच्या आधारे दि. १७ मार्च रोजी सोयमदिप उर्फ लाल्या वसंत जोंधळे, अमोल उर्फ बंटी अनिल गायकवाड, अजय पुंडलीक नवघडे, अनिल गणपत नवघडे, गंगाप्रसाद पुंडलीक नवघडे सर्व रा. बळीरामपुर व गोविंद कॉलनी सिडको येथील विनोद उत्तम हणमंत्ते या सहा जणांना अटक केली. त्यांच्याकडून ५ क्वींटल सोयाबिन, २ पाण्याची मोटार, १ सबमर्शिबल मोटार, १ स्पेलंडर मोटार सायकल, १ पल्सर मोटारसायकल व १ ॲटो असा एकूण ३ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोउपनि बि.ई. चव्हाण, पोहेकॉ मोरे, तिडके, भिसे, कलंदर, शिरगीरे, माळगे, सिरमलवार यांच्या पथकाने केली.

**कार्यालय नगरपरिषद, किनवट जि. नांदेड**
**नविन, प्रशासकीय ईमारत, नागरी दवाखान्याच्या बाजूस किनवट ता. किनवट जि. नांदेड**
**फोन के (०२४६९-२२२१११) देवका के (०२४६९-२२२१११)** Email: cokinwat@gmail.com
**जा.क्र/२८२/२०२५** **दिनांक : १३/०३/२०२५**

**जाहिर आवाहन**

याद्वारे किनवट शहरातील सर्व सुजान नागरीकांना जाहिर आवाहन करण्यात येते की, किनवट शहरातील वाढते अतिक्रमन, बॅनर / पोस्टर, प्लास्टीक बंदी, कर/ पाणी पट्टी, विविध योजना, इ. बाबतीत खालील आवाहनाचे पालन करावे.
१) शहरातील नागरीकांनी आपल्या घरात निर्माण होणारा कचरा ओला व सुका असा वर्गीकृत करुनच न.प.च्या घंटागाडीत द्यावा.
२) शहरातील सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर कचरा टाकणे, सार्वजनिक ठिकाणी थुकने, अस्वच्छता ठेवणे, उघड्यावर लघवी करणे, उघडयावर शौचास जाणे कायद्याने गुन्हा आहे असे आढळल्यास दंडात्मक कार्यवाही केली जाईल.
३) शहरातील बॅनर पोस्टर आस्थापना धारकांनी नगर परिषदेच्या पुर्व परवानगी शिवाय कोठेही अनाधिकृत बॅनर/पोस्टर लावु नये. असे आढळल्यास सदरील बॅनर पोस्टर मालका विरोधात दंडात्मक कार्यवाही करुन बॅनर पोस्टर जप्त करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
४) सिंगल युज प्लास्टीक न वापरता कापडी पिशवी वापरावीत. प्लास्टीक वापरणा-य आस्थापनांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
५) शहरातील नागरीकांनी आपली हद्द सोडुन नगर परिषदेच्या हद्दीत अतिक्रमन करुन नये, बांधकाम परवानगी शिवाय कुठलीही इमारत उभी करु नये. असे आढळल्यास संबंधितावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
६) शहरातील रहिवासी, वाणिज्य आस्थापना धारकांनी मालमत्ता कर, पाणी पट्टी व दुकान भाडे वेळेत भरणा करुन नगर परिषदेला सहकार्य करावे. थकीत कर धारकांनी तात्काळ नगर परिषदेकडे कर भरणा करावा अन्यथा कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
७) शहरातील मोकाट जनावर मालकांनी आपआपली जनावरे मोकाट न सोडता त्यांची योग्य निगा राखावी अन्यथा मोकाट जनावरे न.प. च्या कोंडवाडयात टाकुन दंड आकारणी करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
८) पंतप्रधान स्वनिधी योजना, पंतप्रधान विश्वकर्मा योजना, पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना व इतर योजना बाबतीत माहिती नगर परिषद किनवट येथे उपलब्ध आहे. त्याचा लाभ लाभार्थीनी घ्यावा.
९) शहरातील व्यापारी, पथविक्रेते, फेरीवाले यांना सुचित करण्यात येते की, आपआपली दुकाने, व्यवसायीक आस्थापना, रस्त्यावर येईल अशा पध्दतीने थाटु नये. अन्यथा अतिक्रमण निष्काषीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
१०) सर्व तक्रार न.प. च्या टोल फ्री १८००२३३२२११, ०२४६९-२२२१११ या क्रमाकांवर तक्रार नोंदवु शकता.
वरिल सुचनाचे पालन करुन नगर परिषदेस सहकार्य करावे.

**(डॉ. अजय कुरवाडे)**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**नगर परिषद किनवट**

# वसई येथील अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी

## गावातील महिलांनी पोलिस अधीक्षकांना दिले निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मार्च**

शहरापासून १० किलो मीटरवर असलेल्या वसई गावात अवैध देशी, विदेशी तसेच हातभट्टीच्या दारूची सर्रास विक्री होत असून दारू विक्रेता दारूड्यांना घरपोच दारू विक्री करीत आहे. त्यामुळे गावातील तरूण पिढी व्यसनाधीन होत असून अनेकांचे संसार उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. अनेकवेळा अवैध दारू विक्रेत्याला येथील महिलांनी विनवणी केली परंतु माझे कोणीच काही करू शकत नाही. अशी अरेरावीची भाषा अवैध दारू विक्रेता महिलांना वापरत असून दि १९ मार्च रोजी अखेर गावातील महिलांनी अवैध दारूविक्री बंद करण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची भेट घेत त्यांचेपुढे संपूर्ण व्यथा मांडली.

वसई या गावात कोरोना काळापासून अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणावर होत आहे. गावातील पुरूष मंडळी, तरूण या दारू अड्ड्यावर पहाटेपासून दारू पिण्यासाठी जात आहेत. शेतात काम करण्याऐवजी तरूण पिढी दारूच्या दुकानावर जाऊन दारू पित आहेत. तसेच विवाहीत पुरूष सुध्दा या दारूच्या नशेत कुटुंबातील स्त्रीया आणि मुलाबाळांना त्रास देत आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबे दारूमुळे उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. अनेक महिलांनी गावातील अवैध दारू बंद करण्यासाठी सरपंचासह गावातील प्रतिष्ठीत लोकांकडे तक्रारी केल्या परंतु अवैध दारू विक्रेता दररोज गावात देशी, विदेशी, हातभट्टी प्रत्येक प्रकारची दारू आणून विक्री करीत आहे. दिवसेंदिवस दारू पिणाऱ्यांची संख्या गावात वाढत असल्यामुळे या गावातील शांतता तसेच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

दरम्यान बुधवारी गावातील महिलांनी हिंगोली येथील पोलिस अधीक्षक कार्यालय गाठून गावातील अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी करीत त्यांच्या व्यथा पोलिस अधीक्षक कोकाटे यांचेसमोर मांडल्या. गावातील अवैध दारूविक्री बंद न केल्यास आमरण उपोषण करण्याचा वेळप्रसंगी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महिलांनी दिला आहे. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा द्वारकाबाई सावळे, कुंताबाई सावळे, लताबाई सावळे, सुनीता सावळे, ज्योत्स्ना सावळे, गिरजाबाई सावळे, सुनीताबाई पांडुरंग सावळे, बायनाबाई सावळे, सुनंदा कुगावकर, त्रिशला सावळे, रत्नमाला उगावकर, छायाबाई कदम, सुशीलाबाई कदम, इंदूबाई कदम, राजामती कदम, भागाबाई शिंदे, रेणुका सावळे, प्रयागबाई सावळे, द्वारकाबाई रंगराव सावळे, भागेरथी कुगावकर, सरपंच उत्तमराव कदम, उपसरपंच सुधाकर सावळे, गणेशराव सावळे, कैलास सावळे आदींच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# वाळूचा ट्रक रोखण्यासाठी गेलेल्या महसूलच्या पथकावर हल्ला

## वसमत ते मालेगाव मार्गावरील घटना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मार्च**

वसमत ते मालेगाव मार्गावर वाळूचा ट्रक रोखण्यासाठी गेलेल्या महसूल पथकावर वाळू माफीयांनी केलेल्या हल्ल्यामध्ये एक तलाठी गंभीर जखमी झाला असून त्यांना तातडीने उपचारासाठी वसमत येथील खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मंगळवारी दि १८ मार्च रोजी रात्री साडे अकरा ते बारा वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार घडला आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, वसमत तालुक्यातून अवैधरित्या होणारा वाळू उपसा व वाहतुक थांबविण्यासाठी महसूल विभागाने पथके स्थापन केली आहेत. या पथकांकडून दिवसा कामकाज करून रात्रीच्या वेळी वाळू घाटाच्या परिसरात तसेच वाहतुक मार्गावर गस्त घातली जात आहे. यावेळी वाहनांची तपासणी केली जात असून अवैधरित्या वाळू वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जात आहे.

दरम्यान, मंगळवारी रात्री तलाठी नागनाथ राऊत, गजानन नागोरे आणि दोन कोतवाल असे चौघे वसमत ते मालेगाव मार्गावर गस्तीवर होते. यावेळी एका ट्रकमधून वाळू वाहतुक होत होती. पथकाने ट्रक चालकास थांबण्याचा इशारा केल्यानंतरही त्याने ट्रक पळविला. त्यामुळे पथकाने पाठलाग सुरू केला. यावेळी ट्रक चालकाने निळा जि नांदेड शिवारात ट्रक थांबवला. यावेळी पाठलाग करणाऱ्या पथकाला तिथे थांबलेल्या काही वाळू माफीयांनी घेरले. यावेळी वाळू माफीयांना मागचा पुढचा विचार न करता तलाठी राऊत यांच्यावर हल्ला चढविला. बेल्ट, वायर तसेच लोखंडी रॉडने त्यांना मारहाण केली. मात्र यावैळी तलाठी नागोरे व इतर दोघांनी माफीयांच्या तावडीतून कशीबशी सुटका करून घेतली. त्यानंतर वाळू माफीया फरार झाले. या मारहाणीत राऊत यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यांना उपचारासाठी वसमतच्या खाजगी रूग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची माहीती मिळताच वसमतच्या तहसीलदार शारदा दळवी यांनी राऊत यांची भेट घेऊन त्यांची चौकशी केली.

दरम्यान, सदर घटना नांदेड जिल्ह्यातील भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत येत असून वसमत पोलिसांनी घटनेची माहीती भाग्यनगर पोलिसांना कळविली आहे. वाळू माफीयांकडून होणाऱ्या हल्ल्यामुळे महसूल पथकामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्ह्यात वाळू माफीयाची लॉबी मोठी असून त्यांना राजकीय पाठबळ मिळत आहे. त्यामुळे वाळू माफीया कोणालाही घाबरायला तयार नाही. महसूल किंवा पोलिस विभागाने जीव धोक्यात घालून पकडलेली वाळू, वाहने सोडण्यासाठी संबंधित पोलिस ठाण्यांना राजकीय पुढाऱ्यांचे कॉल येतात त्यामुळे महसूल, पोलिस हतबल झाले होत असल्याची चर्चा होत आहे.

# सेनगाव येथील वाळू माफीयाकडून रिल्स शेअर करीत दहशत माजविण्याचा प्रयत्न, कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मार्च**

हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील भाऊ कडून वाळू तस्करीतून आलेल्या नोटांचे बंडल दाखवत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

बीड जिल्ह्यातील खोक्या प्रकरण चांगलेच गाजत असतांना सेनगाव तालुक्यातील एका भाऊ वाळू माफीयाकडून वाळू तस्करीतून आलेल्या नोटांचे बंडल दाखवत रिल्स तयार केल्याचा प्रकार समोर येत आहे. सेनगाव तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा करून त्याची वाहतुक केली जात आहे. मात्र महसूल विभागाच्या भरारी पथकांना वाळू माफीयांना आवर घालतांना नाकीनऊ येऊ लागले असल्याचे चित्र आहे. महसूल विभागासह पोलिसांना वाळू माफीयांकडून वाळू उपसा करण्यासाठी वापरले जाणारे यंत्र व इतर साहीत्य जाळून टाकले. मात्र त्यानंतरही वाळू उपसा सुरूच आहे.

दरम्यान, सेनगाव तालुक्यातील एका भाऊ ने वाळू तस्करीमध्ये वारेमाप कमाई केल्याचा आरोप केला जात आहे. त्यातून मिळालेल्या रकमांमध्ये नोटांच्या गड्डया समोर ठेवून रिल्स बनविण्यात आल्या आहेत. समोरील टेबलवर पाचशे, दोनशे, शंभर रूपयांच्या गड्ड्या ठेवल्याचे स्पष्ट झाले आहे. या रिल्स सोशल मिडीयावर व्हायरल झाल्या आहेत. या रिल्सच्य माध्यमातून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

यासंदर्भात सेनगाव तालुक्यातील पिनू वाघमारे, विनोद आठवले, विकास सुतार, मारोती पवार, सचिन जाधव, धीरज सुतार यांनी पोलिस अधीक्षक कार्यालयाकडे निवेदन दिले आहे. यामध्ये वाळू माफीया भाऊ कडून दहशत पसरविण्याचा प्रयत्न आहे. या भागात अवैध वाळू उपसा सुरू असून त्याला आवर घालणे आवश्यक आहे. प्रशासनाने या प्रकाराची दखल घेऊन त्वरीत कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. काही वाळू माफीया अंगावर सोने, काहीजण मंत्र्यांसोबतचे फोटो सोशल मिडीयावर टाकून दबाव टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत.



**हिंगोली– ॲपेक्स अर्बन को ऑप बँक ऑफ महाराष्ट्र आणि गोवा लि यांच्या मालमत्तेचा उपयोग सहकार क्षेत्र वाढीसाठी पुर्नवापर करण्यासाठी करावा अशी मागणी केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शहा यांचेकडे करण्यात आली. यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, रिझर्व बँकेचे संचालक सतीश मराठे, मिलींद काळे, संचालक सुनील देवडा, अध्यक्ष ज्योतिंद्र मेहता, उदय जोशी, संजय पाचपोर, कोकारे, कासार आदींची उपस्थिती होती. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### शहर पोलिस ठाण्यात शांतता समितीची बैठक



हिंगोली– येथील शहर पोलिस ठाण्यात आगामी रमजान ईद व इतर सण, उत्सवाच्या निमित्ताने शांतता समितीची बैठक पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडली. यावेळी या काळात सर्व समाजाने सलोख्याने आणि बंधुभावाने सण, उत्सव साजरे करावेत तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे. कोणीही अफवा पसरवू नये, संदीग्ध काही आढळल्यास त्याची पोलिसांना तत्काळ माहीती द्यावी, मिरवणुका व इतर कार्यक्रम शांततेत पार पाडावेत अशा सूचना पोनि पाडळकर यांनी दिल्या.यावेळी शांतता समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### कुरूंदा पोलिस ठाण्यांतर्गत दोन आत्महत्या

कुरूंदा– वसमत तालुक्यातील कुरूंदा पोलिस ठाण्यांतर्गत दोन वेगवेगळ्या घटनेत महागाव येथील शेतकऱ्याने नापिकीला कंटाळून तर कोर्टा येथील विद्यार्थीनीने अभ्यासाच्या तणावातून गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार महागाव येथील शेतकरी बालाजी सवंडकर वय ४५ यांना दोघा भावांमध्ये मिळून चार एकर शेती आहे. या शेतावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. मात्र यावर्षी अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम हाती आला नाही तर रब्बी हंगामातील पिकांनाही उतारा आला नाही. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा या विवंचनेत मागील काही दिवसांपासून ते अस्वस्थ होते. दरम्यान रविवारी दि १६ रात्रीच्या सुमारास शेतकरी बालाजी यांनी घरातील हॉलमध्ये गळफास घेवून आत्महत्या केली. या प्रकरणी विश्वनाथ सवंडकर यांनी दिलेल्या माहीतीवरून कुरूंदा पोलिस ठाण्यात दि १७ मार्च रोजी अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे. सपोनि रामदास निरदोडे, जमादार भगीरथ सवंडकर यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. मयत बालाजी यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. कोर्टा येथील विद्यार्थीनी आयोध्या रणमाळ मुळगाव धारमाथा ही बीएस्सी प्रथम वर्षाला शिक्षण घेत होती. या अभ्यासाचा ताण आल्यामुळे तिने सोमवार दि १७ मार्च रोजी सायंकाळी घरी कोणी नसतांना गळफास घेऊन आत्महत्या केली. सायंकाळी तिची आई शेतातून आल्यानंतर आयोध्याचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला. कुरूंदा पोलिस ठाण्याचे सपोनि रामदास निरदोडे, उपनिरीक्षक आगलावे, सवंडकर, पोले यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. आत्माराम कदम यांच्या माहीतीवरून अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसलेंची अचानक आरोग्य केंद्रांना भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मार्च**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी अचानक सिरसम आणि फाळेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेट दिली. यावेळी कामकाजाची पाहणी करीत ग्रामीण भागातील रूग्णांना तातडीच्या आरोग्य सेवा देण्याच्या सूचना त्यांनी केल्या. हिंगोली जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राकडून दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांची तपासणी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी अचानक भेट दिली. हिंगोली तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या सिरसम प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी रूग्णालयाच्या कामकाजाची पाहणी केली. तसेच दररोज किती रूग्णांची तपासणी केली जाते, किती रूग्णांना रेफर केले जाते, रेफर केल्याची कारणे योग्य आहेत की नाही याची पाहणीही केली. याशिवाय काही रूग्णांशी संवादही साधला. त्यानंतर त्यांनी थेट फाळेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. यावेळी तिथे वैद्यकीय अधिकारी उपस्थित नव्हते.मात्र अधिक चौकशी केल्यानंतर ते आरोग्य सेवेच्या कामासाठी बाहेर होते. तर दुसरे वैद्यकीय अधिकारी हजर असल्याचे दिसून आले. याठिकाणीही त्यांनी कामकाजाची पाहणी केली.

यावेळी ग्रामीण भागातील रूग्णांना तातडीच्या आरोग्य सेवा मिळवण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून काम करण्याच्या सूचना भोसले यांनी दिल्या. विनाकारण रूग्णांना रेफर करू नये त्यांच्यावर आरोग्य केंद्र स्तरावर उपचार करावेत. तसेच रूग्णांना त्यांच्या नातेवाईकांना योग्य वागणुक द्यावी. एकही रूग्ण उपचाराविना परत जाऊ नये याची दक्षता घेण्याच्या सूचना यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी दिल्या.

# शिरड शहापूर येथे ॲग्रीस्टॅक अभियान संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १९ मार्च**

जिल्हाधिकारी हिंगोली यांच्या आदेशावरून शिरड शहापूर येथील तलाठी कार्यालय शिरड शहापूर या ठिकाणी ॲग्रीस्टॅक नोंदणी अभियान संपन्न झाले. शिरड शहापूर परिसरातील शेतकऱ्यांनी बऱ्यापैकी सहभाग नोंदविला. शेतकऱ्यामध्ये जनजागृती होणे गरजेचे आहे. बरेच लाभार्थी असे आहेत की ज्यांच्याकडे संपर्क होऊ शकत नाही, तरी तलाठी ज्योती स्वामी व शिरड शहापूर येथील सर्व केंद्र चालक यांनी शेतकऱ्यांना फोन करून बोलवून ॲग्रीस्टॅक नोंदणी केली. शिरड शहापूर येथील सर्व शेतकरी तीन ते चार दिवसात नोंदणी पूर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे असे कृषी सहाय्यक अक्षय राठोड, ग्राम सेवक हलबुर्गे, तलाठी ज्योती स्वामी यांनी सांगितले सदरील शिबीरात आनंद ढेंबरे, सोनू लांडगे, सोमनाथ ठोंबरे, गणेश विभुते, रामकिशन बोंगणे, शेख अख्तर, प्रमोद ठोंबरे, हर्षद हजारे यांनी मदत केली.

# हिंगोलीतील आदर्श महाविद्यालयास करिअर कट्टाचे पाच पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मार्च**



महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत नांदेड विभागीय महाविद्यालयीन स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शारदा भुवन एज्युकेशन सोसायटीच्या शंकरराव चव्हाण मेमोरियल हॉलमध्ये नांदेड विभागीय पुरस्कार वितरण सोहळा व एकदिवसीय कार्यशाळा सन २०२५ संपन्न झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे माजी उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री डी. पी. सावंत हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, डॉ. किरणकुमार बोंदर (सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग) डॉ. डी. डी. पवार (कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड) यशवंत शितोळे (अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र), प्राचार्य डॉ. पंजाबराव चव्हाण (नांदेड विभागीय प्राचार्य प्रवर्तक), प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांच्यासह नांदेड विद्यापीठ परीक्षेत्रातील महाविद्यालयीन समन्वयक, तालुका समन्वयक, जिल्हा समन्वयक व प्राचार्य प्रवर्तक हे बहुसंख्येने उपस्थित होते.

या महाविद्यालयीन स्पर्धेत आदर्श महाविद्यालय, जिल्हास्तरीय उत्कृष्ट महाविद्यालय प्रथम क्रमांक, प्राचार्य प्रो.डॉ. विलास आघाव यांना हिंगोली जिल्हा स्तरीय उत्कृष्ट प्राचार्य प्रथम क्रमांक, डॉ. दयाराम द. मस्के यांना उत्कृष्ट जिल्हा समन्वयक, डॉक्युमेंटरी मेकिंग जिल्हा स्तरीय प्रथम क्रमांक तसेच नांदेड विभागातुन देखील प्रथम क्रमांक पटकावला आहे. दुर्घटनेची वाट या शिर्षकाची रस्ते वाहतूक या विषयावर विश्वभूषण फकिरा गायकवाड, उमेश गणेश चुनडे, संतोष नागोराव इंगोले, कृष्णा लक्ष्मण इंगोले, अर्जून गजानन हर्नेकर, शुभम शिवाजीराव चव्हाण, वैभव मारोती पवार, मंगेश प्रकाश शेळके या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या माहितीपटाला हिंगोली जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक तसेच नांदेड, लातुर, परभणी व हिंगोली या चारही जिल्ह्यांच्या विभागीय स्पर्धेत आदर्श महाविद्यालयाला प्रथम क्रमांक मिळाला आहे. सर्व पुरस्कार महाविद्यालयाला प्राप्त झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचाय प्रो.डॉ. विलास आघाव, स्पर्धा परीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र तसेच करिअर कट्टाचे संयोजक डॉ. दयाराम मस्के, यशस्वी स्पर्धक विद्यार्थी यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कमलकिशोर काबरा, सचिव राम चन्द्र कयाल, उपाध्यक्ष गणेशप्रसाद चौधरी, सर्व संचालक मंडळ यांनी अभिनंदन केले.